रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २३९
www.ramprahar.com
◆ बुधवार, १८ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग
मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर दरड कोसळली/२
महाड एमआयडीसीत विजेच्या धक्क्याने कामगाराचा मृत्यू/५
बीबीएल सीझन-२चा नाइट रायडर्स संघ विजेता/८

## काबूलमध्ये पाकिस्तानच्या हल्ल्यात ४०० जणांचा मृत्यू

**काबूल :** अफगाणिस्तानची राजधानी काबूल येथे असलेल्या व्यसनमुक्ती उपचार रुग्णालयावर



पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यात सुमारे ४०० जणांचा मृत्यू झाला असून २५० जण जखमी झाले आहेत. अफगाणिस्तानच्या इस्लामिक अमिरातचे उपप्रवक्ते हमदुल्ला फितरत यांच्या म्हणण्यानुसार पाकिस्तानच्या सैन्याने सोमवारी रात्री सुमारे ९ वाजता काबूलमधील उमीद ॲडिक्शन ट्रीटमेंट हॉस्पिटल या दोन हजार खाटांच्या नशामुक्ती रुग्णालयावर हवाई हल्ला केला. या हल्ल्यामुळे रुग्णालयाचा मोठा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला असून ढिगाऱ्यातून मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानचा तीव्र शब्दात निषेध केला असून सामान्य नागरिकांना लक्ष्य करणारे हे भ्याड आणि अक्षम्य कृत्य असल्याची टिप्पणी केली आहे.

# जि.प., पं.स.मध्येही आता स्वीकृत सदस्य

**मुंबई : प्रतिनिधी**

महापालिका, नगरपालिकांप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक २०२६ मंगळवारी (दि. १७) विधानसभेत मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये एकूण १००५ नवीन सदस्यांची भर पडणार आहे.

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक क्षेत्र आणि विविध तांत्रिक विषयांतील तज्ज्ञांचा अनुभव प्रशासनाला मिळावा या उद्देशाने राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक सभागृहात



चर्चेसाठी मांडले होते. विधेयकातील तरतुदींनुसार जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या एकूण सभासद संख्येच्या १० टक्के किंवा किमान पाच सभासद (यापैकी जे अधिक असेल ते) नामनिर्देशित केले जातील. त्याचप्रमाणे पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या २० टक्के किंवा किमान एक सदस्य नामनिर्देशित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

### विधानसभेत विधेयक मंजूर

यामुळे राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमधील दोन हजार २१० निर्वाचित सदस्यांच्या जोडीला आता २०१ स्वीकृत सदस्य कार्यरत होतील, तर ३०१ पंचायत समित्यांमधील चार हजार २४ सदस्यांच्या संख्येत ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडेल. या नामनिर्देशित सदस्यांना प्रशासकीय कामकाजात सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन देता येईल, मात्र त्यांच्या राजकीय अधिकारांवर काही मर्यादा असतील. त्यांना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सभेतील प्रस्तावावर मतदान करता येणार नाही. हे सदस्य अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती किंवा उपसभापती यांसारख्या पदांच्या निवडीसाठी पात्र ठरणार नाहीत. त्यांचा कार्यकाळ संबंधित परिषद किंवा समितीच्या मुदतीबरोबरच संपुष्टात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे. हे नामनिर्देशन करताना संबंधित सभागृहातील राजकीय पक्षांचे तौलनिक संख्याबळ आधारभूत मानले जाईल. त्या-त्या पक्षांच्या नेत्यांशी विचारविनिमय करून संख्याबळाच्या प्रमाणात या जागांचे वाटप केले जाईल. नियुक्त सदस्यांची नावे राज्य निवडणूक आयोगाद्वारे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

## धर्मस्वातंत्र्य विधेयकाला आमदार प्रशांत ठाकूर यांचे जोरदार समर्थन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात जबदस्तीने किंवा प्रलोभनाव्दारे धर्मांतर रोखण्यासाठी सरकारने प्रस्तावित केलेला महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा २०२६ हा कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठीचा एक अत्यंत आवश्यक निर्णय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण आणि बेकायदेशीर धर्मांतरांना आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सादर केलेल्या विधेयकाचे स्वागत करण्यात आले आहे.



या विधेयकावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत विधेयकाचे स्वागत केले. यावेळी त्यांनी राज्यातील विविध भागांमध्ये विशेषतः आदिवासी व अनुसूचित जमातींमध्ये तसेच शहरी भागातही योजनाबद्ध पद्धतीने धर्मांतराचे प्रयत्न सुरू असल्याची बाब अधोरेखित केली. पनवेल, खारघर यांसारख्या भागांमध्येही असे प्रकार घडत असल्याचे नमूद करत या प्रवृत्तीला रोखण्यासाठी कठोर कायद्याची गरज असल्याचे सांगण्यात आले. इतिहासातील छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचा उल्लेख करत धर्म आणि स्वाभिमान जपण्याची परंपरा महाराष्ट्रात असल्याचे स्पष्ट करून धर्मरक्षणासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

विधेयकातील ३० दिवसांच्या नोटीससारख्या तरतुदींबाबत बोलताना धर्मांतर स्वेच्छेने की प्रलोभनातून होत आहे याची पडताळणी करण्यासाठी ही तरतूद आवश्यक असल्याचे सांगण्यात आले तसेच सामुदायिक धर्मांतराच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठीही हे विधेयक उपयुक्त ठरेल, असे नमूद करण्यात आले. हे विधेयक योग्य वेळी सादर करण्यात आले असून संपूर्ण सभागृहाने यास पाठिंबा देऊन मंजुरी द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, धर्मांतराच्या अनुषंगाने विखारी प्रचार चालतो आणि त्या माध्यमातून धर्मांतर करण्याचा प्रयत्न होतो. अशा पद्धतीचे प्रकार शहरांमध्येसुद्धा अगदी माझ्या मतदारसंघांमधल्या पनवेल, खारघर यासारख्या ठिकाणी चालू आहेत. असेच महाराष्ट्रभर प्रयोग सुरू आहेत. हे सर्व प्रयत्न थांबवण्यासाठी विधेयक आणण्यात आले, ज्याचे मी प्रथम स्वागत करतो आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो. धर्मांतरविरोधी विधेयकाला काही सदस्यांनी केलेला विरोध हा देशाच्या सांस्कृतिक जडणघडणीविरोधातील मानसिकतेतून प्रेरित असल्याची टीका सभागृहात करण्यात आली. या विधेयकाला विरोधकांचा असलेल्या विरोधाचा उद्देश केवळ त्यांच्या मतदारसंघात स्वतःला धर्मरक्षक म्हणून सादर करण्याचा असल्याचा आरोपही करण्यात आला. सभागृहात बोलताना अबू आझमी यांनी हे विधेयक कचऱ्याच्या कुंडीत फेकले पाहिजे, असे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेत विरोधकांची मानसिकता चिंताजनक असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले तसेच यावरूनच या विधेयकाची आवश्यकता अधोरेखित होते, असेही स्पष्ट केले.

पनवेलमधील तळोजा, खारघरसारख्या परिसरात जाणीवपूर्वक वेगवेगळ्या पद्धतीच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून एक भीती निर्माण करण्याचा प्रयत्न होतोय आणि त्याच्या विरोधात समाजाला ताकद देणे आवश्यक असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. (पान २ वर..)

## पनवेल मनपा स्थायी, महिला व बालकल्याण समिती सभापती निवडीसाठी आज विशेष सभा

### भाजपकडून बबन मुकादम, ममता म्हात्रे यांचे अर्ज दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या स्थायी समिती तसेच महिला व बालकल्याण समिती सभापतीपदासाठी बुधवारी (दि.१८) सायंकाळी ४ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या पदांसाठी भाजप महायुतीकडून अनुक्रमे बबन नामदेव मुकादम आणि ममता प्रितम म्हात्रे यांनी मंगळवारी अर्ज दाखल केले.



पनवेल महापालिका निवडणुकीत भाजप महायुतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्यांदा एकहाती विजय मिळवला. त्यानंतर विविध निवडी होत आहेत. स्थायी समिती सभापतीपदासाठी बबन मुकादम आणि महिला व बालकल्याण समिती सभापतीपदासाठी ममता म्हात्रे यांनी नगरसचिव नानासाहेब कामठे यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल केले. (पान २ वर..)

## विद्यार्थिनीवर ॲसिड हल्ला

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात वडगाव पान शाळेत सहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीवर ॲसिड हल्ला करून आरोपी फरार झाला. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

इयत्ता सहावीत शिकणारी ही विद्यार्थिनी शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना एका युवकाने अचानक तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले. मुलीने आरडाओरड केल्यानंतर लोक गोळा झाले आणि तिला रुग्णालयात हलविण्यात आले. पोलिसांनी विकृत तरुणाचा शोध सुरू केला आहे.



**पनवेल : येथील महापालिकेचे नवनिर्वाचित सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी अमोल जाधव, प्रकाश सोनावळे, ॲड. शिवकुमार कांबळे, आदित्यनाथ बोराडे, श्रीपाद भंडारी, विनोद जोशी, ॲड. अक्षय मिसाळ, सुमित सकपाळ, संतोष मस्के, प्रथमेश भंडारी, श्याम साळवी आदी उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ॲड. बिनेदार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## ‘ड्रग्सविरोधात झिरो टॉलरन्स धोरण राबवणार’

**मुंबई :** नागपूर शहरातील मोतीबाग परिसरात अमली पदार्थ (ड्रग्स) तस्करांविरोधात झालेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन अमली पदार्थांविरोधात ‘झिरो टॉलरन्स’ धोरण राबविणार आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींची संपत्ती जप्त करण्यासह कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

अल्पवयीन मुलांचा ड्रग्स तस्करीत वापर गंभीर असून अशा गुन्ह्यांसाठी कायदेशीर वयोमर्यादा १८वरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त ‘निष्पाप’ नाटकाचा प्रयोग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत मुंबई मराठी पत्रकार संघ प्रस्तुत ‘निष्पाप’ या नाटकाचे विनामूल्य सादरीकरण करण्यात येणार आहे. हा प्रयोग येत्या शनिवारी (दि. २१) दुपारी ४.३० वाजता पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडणार आहे.

चोवीस तास बातम्यांच्या जगात वावरणाऱ्या पत्रकारांच्या संवेदनशीलता आणि सर्जनशीलतेला रंगभूमीवर व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मुंबई मराठी पत्रकार संघाने पहिल्यांदाच ६४व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवत पदार्पणातच दोन पुरस्कार पटकावण्याचा मान मिळवला आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण निर्मित ‘निष्पाप’ नाटकासाठी लेखक प्रा. दिलीप परदेशी यांचे प्रभावी लेखन आणि दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांचे कसदार दिग्दर्शन लाभले आहे. हे नाटक पत्रकारांच्या अभिनयकौशल्याला नवी दिशा देणारे ठरत आहे. (पान २ वर..)

## गुढीपाडव्यानिमित्त विविध साहित्याने बाजारपेठ सजली



**पनवेल : वार्ताहर**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त बाजारपेठ विविध साहित्याने सज्ज झाली आहे. साखरेची गाठी, वस्त्र व अन्य साहित्य विक्रीसाठी उपलब्ध असून लोक खरेदी करताना दिसून येत आहेत.

मराठी नववर्षाचा पहिला दिवस चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यापासून सुरू होतो. यंदा पाडवा येत्या गुरुवारी १९ मार्चला साजरा होत आहे. गुढीपाडव्याचा खास मान असलेल्या साखरेच्या गाठी या वर्षी विविध रंगांमध्ये बाजारात आल्या आहेत. किमान २० रुपयांपासून ते १०० रुपयांपर्यंत त्या उपलब्ध आहेत.

गुढी म्हणजे आनंद, विजय आणि स्वागताचे प्रतीक. उंच बांबूपासून गुढी तयार केली जाते. बांबूच्या एका टोकाला रेशमी कापड, कडुलिंबाचा, फुलांचा हार आणि साखरेची माळ बांधून त्यावर धातूचे भांडे (तांब्या) बसवला जातो. नंतर गुढी पाटावर उभी केली जाते. आताच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या युगात गुढी उभारण्यासाठी पुरेसा वेळही मिळणे कठीण झाले आहे. याला पर्याय म्हणूनच रेडिमेड गुढीचा नवा ट्रेण्ड निर्माण झाला.

टेबलवर, कारमध्ये ठेवता येण्यासारख्या छोट्या गुढीसह मोठ्या रेडिमेड गुढ्या अत्यंत कमी किमतीत ६५ ते २५० रुपयांपर्यंत बाजारात उपलब्ध आहेत. पाट आणि त्यावर असलेले नक्षीदार कापड, नारळ, तांब्या, आंब्याची पाने, गुढीभोवती असलेले रेशमी कापड, हार आदी सर्व साहित्याचा समावेश या मिनी गुढीत पहायला मिळतो.

### शोभायात्रेचीही जय्यत तयारी

मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्याकरिता दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्याच्या दिवशी म्हणजेच गुरुवारी (दि.१९) पनवेल येथे नववर्ष स्वागत समितीतर्फे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथून या शोभायात्रेची सुरुवात होणार असून कर्मवीर भाऊराव पाटील चौक, टपाल नाका (शनी मंदिर), महात्मा गांधी मार्ग, मिरची गल्ली, कापड बाजार, जय भारत नाका, लोकमान्य टिळक मार्ग या मार्गे फिरून स्वा. सावरकर चौक येथे समाप्त होणार आहे. यावेळी युवानाद ट्रस्टतर्फे ध्वज-लेझीम-ढोल पथकात १५० मुले सहभागी होणार आहेत.



# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आडोशी बोगद्यात दरड कोसळली

## बस आणि कारचे नुकसान; मोठी दुर्घटना टळली

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर मंगळवारी दुपारी आडोशी बोगद्यात बोगद्याचे दगड आणि माती कोसळली. दरड खाजगी प्रवासी बसवर आणि कारवर कोसळली असून यात कोणतीही जीवितहानी किंवा कोणीही जखमी झाली नाही, मात्र यामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.



एक्सप्रेस वेवरील मुंबई लेनवरील आडोशी बोगद्याचे छताचे दगड आणि मातीचा लगदा पडला. त्याच वेळी मुंबई कडे जाणारी वाहतूक सुरू होती. मातीचा लगदा आणि दगडाचे तुकडे भरधाव वेगात जाणाऱ्या खाजगी बस आणि कारवर पडली. सुदैवाने मोठी दुर्घटना घडली नाही, या घटनेत कोणीही जखमी झाले नाही, मात्र मुंबईकडे जाणारी वाहतूक १५ मिनीटे बाधीत झाली. घटनेची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल होत दरड हटविण्याचे काम युद्ध पातळीवर केले.

याबाबत बोरघाट मदत केंद्राचे सहायक पोलीस निरीक्षक स्वप्नील पाटील यांनी सांगितले की घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस व संबंधित यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेत किरकोळ नुकसान झाले असून दरड नव्हे तर गन प्लास्टरचा काही भाग मुंबई कडे जाणाऱ्या मार्गीकेवर कोसळला. लागलीच मलबा हटविण्याचे काम सुरू केल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण झाला नाही.मात्र मलबा नसुन माती आणि दगडांचे तुकडे मार्गावर पसरल्याचे चित्र होते.

## स्कुटीचोर राजेंद किळंजेच्या पेण पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये दोन ठिकाणावरून स्कुटी चोरीच्या घटना घडल्या होत्या. पेण पोलिसांनी अगदी शिताफीने राजेंद्र नथुराम किळंजे उर्फ अबु (रा. नागोठणे) याला दोन एक्टीव्हा स्कुटी चोरल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. पेण पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण कक्षाने केलेल्या तपासात त्याने दोन्ही गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्याच्याकडून चोरीला गेलेल्या दोन्ही स्कुटी जप्त करण्यात आल्या आहेत.

यामध्ये एक लाल रंगाची होंडा कंपनीची एक्टीव्हा स्कुटी अंदाजे रक्कम २० हजार तर एक निळ्या रंगाची टीव्हीएस कंपनीची ज्यूपिटर स्कुटी किंमत अंदाजे २५ हजार असा जप्त गाड्यांचा समावेश आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांच्या सुचना प्रमाणे गुन्हेप्रकटीकरण कक्षातील अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक निलेश राजपूत, पोलीस उपनिरीक्षक सुनिल चव्हाण, सहा. पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोहावा. प्रकाश कोकरे, अजिंक्य म्हात्रे, सचिन व्हसकोटी, सुशांत भोईर, अमोल म्हात्रे, गोविंद तलवारे, संदिप शिंगाडे यांनी तपास केले.

## सुट्टीच्या दिवशीही दस्त नोंदणी राहणार सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी, तसेच नुतन वर्षाच्या सुरुवातीला नविन मालमत्ता खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल असतो. त्यामुळे दस्त नोंदणी वाढते, ही बाब लक्षात घेऊन सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरु ठेवण्याचे आदेश नोंदणी महानिरीक्षकांनी सर्व जिल्ह्यातील मुद्रांक जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

या आदेशांनुसार २६ मार्च, २८ मार्च, २९ मार्च आणि ३१ मार्च या दिवशी राज्यभरात दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालये सुरु ठेवली जाणार आहेत. या शिवाय सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयेही सुरू ठेवली जाणार आहेत.

ज्या दुय्यम निबधक कार्यालयांची साप्ताहीक सुट्टी ही शनीवार आणि रविवार वगळून असते. ती कार्यालये साप्ताहीक दोन सुट्ट्यांपैकी एक दिवस सुरु ठेवण्याचे निर्देश नोंदणी उपमहानिरीक्षकांनी दिले आहेत. मुंबई शहर आणि मूंबई उपनगर यांच्यासह सर्व जिल्ह्यांसाठी हे आदेश लागू असणार आहेत. दरवर्षी मार्च महिन्याच्या उत्तरार्धात दस्त नोंदणी प्रमाण वाढत असते.

## नेरळ ग्रामपंचायतीने महावितरणचे ८० लाख थकवले; वीजपुरवठा खंडित झाल्याने पाणीबाणी

**नेरळ : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या नेरळमध्ये ऐन उन्हाळ्यात पाणीबाणीने भीषण रूप धारण केले आहे. कडाक्याच्या उन्हात नागरिकांना पाण्याचा एक थेंबही मिळत नसल्याने गावात संतापाची लाट उसळली आहे. नळांना पाणीच येत नसल्यामुळे घराघरात पाण्याचा तुटवडा निर्माण झाला असून ग्रामस्थ अक्षरशः टाहो फोडत आहेत.

या संकटामागे अत्यंत धक्कादायक कारण समोर आले आहे. नेरळ ग्रामपंचायतीने महावितरणचे सुमारे ८० लाख रुपयांचे वीज बिल थकविल्यामुळे १६ मार्च रोजी महावितरण कंपनीने पाणीपुरवठ्याचा वीजपुरवठाच खंडित केला. त्यामुळे संपूर्ण गावाचा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. एकीकडे पाण्यासाठी नागरिक हैराण झाले असताना दुसरीकडे ग्रामपंचायत प्रशासन मात्र जबाबदारी झटकताना दिसत आहे. नागरिकांनी पाणी बिल भरले नाही, त्यामुळे वसुली झाली नाही, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. मात्र ग्रामस्थांनी यावर संताप व्यक्त करत आम्ही बिल भरतो, मग आम्हालाच पाण्यापासून वंचित का? असा सवाल उपस्थित केला आहे.

ज्येष्ठ नागरिक माधवराव गायकवाड यांनी ग्रामसेवक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यावर ग्रामपंचायतीने अर्धी थकबाकी भरून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात नंबर प्लेट नसलेल्या डंपरचालकाला नागरिकांनी पकडले

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात मागील काही दिवसांपासून विविध विकास प्रकल्प सुरू आहेत. या विकास प्रकल्पांवरती अनेक डंपर मटेरियलची वाहतूक करताना पाहायला मिळतात. त्याचप्रमाणे तालुक्यात उत्खनन करण्यात येणारे बॉक्साइट देखील डंपरद्वारे वाहतूक करण्यात येत असते, मात्र आज दुपारी श्रीवर्धन हरीहरेश्वर मार्गावरील गालसुरे गावाच्या हद्दीत एक डंपर चालक, डंपरच्या पुढच्या व मागच्या बाजूला कोणतीही नंबर प्लेट नसताना सुसाटपणे डंपर चालवत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. सदर डंपर चालकाला नागरिकांनी अडविल्यानंतर तो थांबला. डंपर खाली करून येत असल्यामुळे रिकामा असल्याने डंपर चालक गाडी सुसाट वेगाने चालवत होता.

अशाप्रकारे सुसाट वाहन चालक वाहन चालवीत असल्यामुळे अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढला आहे. अशा प्रकारे अपघात घडल्यास डंपरला नंबर प्लेट नसल्यामुळे चालकाला पळून जाण्यास मोकळे रान मिळते. नुकतेच पेण येथील प्रादेशिक परिवहन विभागाने श्रीवर्धन तालुक्यात अनेक डंपर्स वरती कारवाई देखील केली होती. परंतु इतके होऊन सुद्धा डंपर चालक व मालक मुजोरपणे गाड्या हाकत असल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी प्रादेशिक परिवहन विभाग पेण व स्थानिक पोलिसांनी सदर डंपर चालकाला शोधून काढून त्याच्यावरती कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## कोंडीवली-आरावी किनाऱ्यावर निसर्गाचा चमत्कार; ऑलिव्ह रिडले कासवांची ११३ पिल्ले समुद्रात सोडली

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील निसर्गरम्य कोंडीवली आणि आरावी समुद्रकिनाऱ्यांनी यंदा एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद क्षण अनुभवला. प्रथमच येथे ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांचे यशस्वी संवर्धन करण्यात आले असून ९ मार्च ते १४ मार्च या कालावधीत तब्बल ११३ पिल्लांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात-समुद्रात-सुरक्षितपणे सोडण्यात आले.



या अनोख्या उपक्रमामुळे परिसरात पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकतेचा नवा अध्याय लिहिला गेला आहे. वन परिक्षेत्र अधिकारी कुलदीप पाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली कांदळवन कक्ष, रायगड आणि ग्रुप ग्रामपंचायत खारगांव यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला. वनरक्षक ऋषिकेश लवाटे, कासव मित्र कृष्णा पिलनकर, कृष्णा पुसाळकर, सरपंच अमोल पुसाळकर, उपसरपंच अरमान राऊत, प्रा. योगेश लोखंडे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

आरावी आणि कोंडीवली हे समुद्रकिनारे आधीच त्यांच्या नैसर्गिक सौंदर्यामुळे पर्यटकांना आकर्षित करत आहेत. आता या ठिकाणी कासव संवर्धनाची भर पडल्याने पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना मिळणार आहे. भविष्यात येथे 'ऑलिव्ह रिडले कासव महोत्सव' आयोजित करण्याचा विचार असून त्यामुळे या किनाऱ्यांना राज्यस्तरावर वेगळी ओळख मिळण्याची शक्यता आहे.

या हंगामात समुद्री कासवांनी किनाऱ्यावरील वाळूत अंडी घातल्यानंतर त्यांचे संवर्धन अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आले. अंड्यांचे संरक्षण करण्यासाठी ती सुरक्षित ठिकाणी हलवून नैसर्गिक हॅचरीमध्ये ठेवण्यात आली. कुत्रे व इतर वन्यप्राण्यांपासून धोका टाळण्यासाठी बांबूच्या टोपल्यांचा वापर करण्यात आला.

कासवांची अंडी नैसर्गिकरीत्या उबवण्यासाठी साधारण ४५ ते ६० दिवस लागतात. या काळात स्थानिक नागरिकांनी किनाऱ्याची स्वच्छता राखत सतत गस्त घालून अंड्यांचे रक्षण केले.

कासव मित्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वयंसेवकांनी या कामात मोलाची भूमिका बजावली.या उपक्रमामुळे केवळ कासवांचे संवर्धन झाले नाही, तर स्थानिकांमध्ये पर्यावरणाबद्दलची जबाबदारीही वाढली आहे. कोंडीवली व आरावी किनाऱ्यावर सुरू झालेला हा प्रयत्न भविष्यात इतर किनाऱ्यांसाठी आदर्श ठरू शकतो.

## मेडिकल अँड हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्डने महाडचे डॉ. हिंमतराव बावस्कर सन्मानित

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड येथील बावस्कर हॉस्पिटल अँड क्लिनिकल रिसर्च सेंटरचे डॉ. हिंमतराव साळुबा बावस्कर यांना सीताराम जयपूरिया फाउंडेशनतर्फे आयोजित मेडिकल अँड हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्ड्सच्या तिसऱ्या एडिशनमध्ये प्रतिष्ठित एक्झेम्प्लर लीडरशिप इन रुरल मेडिसिन अँड हेल्थकेअरअवॉर्डसह सन्मानित करण्यात आले. भारतातील आरोग्य यंत्रणा प्रबळ करणाऱ्या आणि वैद्यकीय समुदायाला प्रेरित करणाऱ्या दिग्गज डॉक्टरांना एकूण ९० लाख रुपयांचे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा एसजेएफ सायण्टिफिक सिम्पोजियम अँड अवॉर्ड्स प्रोग्रामचा भाग म्हणून नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला. या दिवसभर चाललेल्या परिसंवादामध्येवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी 'लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर हृदय-चयापचयाशी संबंधित आजार' या विषयावर चर्चा करण्यासोबत ज्ञानाची देवाणघेवाण केली. सीताराम जयपूरिया फाउंडेशनद्वारे आयोजित, तसेच एसजेएफचे अध्यक्ष आणि कॉस्मो फर्स्ट लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अशोक जयपूरिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या इव्हेण्टमध्ये नामवंत डॉक्टर, संशोधक आणि आरोग्य सेवा क्षेत्रातील प्रमुख एकत्र आले होते



## माथेरान नगरपालिकेकडून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगर परिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि.१५ रोजी सायंकाळी पाच वाजता असेंब्ली हॉलच्या प्रांगणात भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी माथेरान हद्दीतील विविध कर्तृत्वान महिलांसह नगरपरिषदेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलीस निरीक्षक सुनिता मुसळे उपस्थित होत्या.



सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तदनंतर नगर परिषदेचे विविध विभाग आणि क्रीडा,सामाजिक,शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील यशस्वी महिलांना तसेच नगर परिषदेच्या आरोग्य, कार्यालयीन व सफाई कर्मचाऱ्यासह, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील महिलांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

यावेळी प्लास्टिक मुक्तीचा संदेश देत सर्व उपस्थित महिलांना कापडी पिशव्याचे (जूट बॅग्स) चे वाटप करण्यात आले.

पान १ वरुन

### धर्मस्वातंत्र्य विधेयकाला आमदार प्रशांत ठाकूर यांचे जोरदार समर्थन

यावेळी त्यांनी गजवा ए हिंद, पीएफआय अशा काही संघटनांचा उल्लेख करत बंदी असूनही अशा संघटनांचे अस्तित्व शहरांमध्ये कायम असल्याचा आरोप केला तसेच अशा प्रकारच्या कृतींना संबंधित समाजातून विरोध का होत नाही, असा सवालही उपस्थित केला.

धार्मिक अतिक्रमण, बेकायदेशीर कृती आणि समाजावर दबाव निर्माण करण्याच्या घटनांकडे लक्ष वेधत या सर्व पार्श्वभूमीवरच महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक आवश्यक असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठामपणे सांगितले. समाजात संतुलन राखण्यासाठी आणि बेकायदेशीर धर्मांतरांना आळा घालण्यासाठी हे विधेयक महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी रोखठोकपणे मत मांडताना सांगितले.

### पनवेल मनपा स्थायी, महिला व बालकल्याण समिती सभापती निवडीसाठी आज विशेष सभा

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, नगरसेवक प्रवीण पाटील, मनोज भुजबळ, अजय बहिरा, रवींद्र जोशी, मधू पाटील, समीर कदम, रवींद्र भगत, विजय खानावकर, नगरसेविका राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, सरस्वती काथारा, हेमलता गोवारी, बायजा बारगजे, प्रतिभा भोईर, लीना म्हात्रे, अस्मिता घरत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थायी तसेच महिला व बालकल्याण समिती सभापतीपदासाठी पीठासीन अधिकारी रणजीत यादव (मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद) यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा होणार आहे. स्थायी समिती सदस्यांमधून स्थायी सभापती आणि महिला व बालकल्याण समिती सदस्यांमधून महिला व बालकल्याण सभापतींची निवड करण्यात येणार आहे. या दोन पदासांसाठी दोनच अर्ज आल्याने ही निवड बिनविरोध होणार आहे.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'निष्पाप' नाटकाचा प्रयोग

या नाटकात ज्येष्ठ पत्रकार देवदास मटाले आणि स्वाती घोसाळकर प्रमुख भूमिकेत आहेत तसेच दिग्दर्शक गुरूदत्त लाड यांच्यासह प्रशांत चिडे, रश्मी महांबरे, सिद्धेश शिगवण आणि सुरेश ठुकरुळ यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. हा नाट्यप्रयोग सर्वांसाठी विनामूल्य असून पनवेल आणि परिसरातील नाट्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी केले.

## नवी मुंबईत बाल रक्षा अभियान अंतर्गत शिक्षकांना प्रशिक्षण

**नवी मुंबई: बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २८, वाशी येथे महाराष्ट्र राज्य बालहक्क अभियान अंतर्गत नवी मुंबईतील दहा बॅचेसमध्ये पाचशे शिक्षकांना बाल संरक्षण या विषयाचे प्रशिक्षण नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात आले. आजच्या शेवटच्या बॅचमध्ये नवी मुंबईतील ६० शिक्षकांनी सहभाग घेतला.



पोस्को कायदा, विद्यार्थी सुरक्षा, सखी सावित्री समिती कार्य, प्रत्येक शाळांमधील आधारभूत प्रणाली, तक्रारपेटीचे महत्व आणि उपयोग, पोलीस मदत, कायदेशीर तरतुदी, आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, तसेच बालहक्क संरक्षण करणाऱ्या विविध संस्था यांची संपूर्ण ओळख शिक्षकांना करून देण्यात आली.ॲड. पल्लवी जाधव आणि सुवर्णा म्हस्के यांनी सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

महिला बाल विकास समिती अधिकारी नमिता शिंदे, शिक्षणाधिकारी अशोक कडूस, केंद्र समन्वयक रेखा पाटील यांनी प्रशिक्षणास भेटी दिल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

## निवडक

### मांस वाहतूकप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** मोठ्या जनावरांचे बीफवर्गीय मांसाची वाहतूक केल्याप्रकरणी रितेश दाजीराम मोहिते (रा. फलटण, सातारा) याच्याविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रतीक ननावरे यांना एका पांढऱ्या रंगाच्या वाहनांमधून बीफवर्गीय मांस मुंबईच्या दिशेने वाहतूक होणार असल्याचे समजले. खारघर पोलिसांच्या मदतीने ते मित्रांसोबत खारघर टोल नाका येथे थांबले. यावेळी पहाटे अडीचच्या सुमारास एका गाडीचा संशय आल्याने तपासणी केली असता गाडीमध्ये बीफ वर्गीय मांसाचे तुकडे आढळले. हे मांस अकलूज, सोलापूर येथील कत्तलखान्यातून आणल्याचे सांगितले. गोवंश मांसाची वाहतूक केल्याप्रकरणी पिकअप चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रिक्षाचालकाकडून गांजा हस्तगत

**पनवेल :** शहर पोलिसांनी सोसायटी नाका ब्रिजच्या खाली टाकलेल्या छाप्यात हजारो रुपये किमतीचा गांजा हा अमली पदार्थ हस्तगत केला असून या प्रकरणी एका व्यक्तीस ताब्यात घेतले आहे. शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने छापा टाकून आरोपी हिमानल्लू सोमनाथ गंठेपागू (वय ३५) या रिक्षा चालकाकडे ताबेकब्जात ४१६ ग्रॅम वजनाचा एकुण अंदाजे २१,००० रूपये किमतीचा 'गांजा' हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे कब्जात बेकायदेशिररित्या बाळगले स्थितीत असताना मिळुन आला म्हणुन त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

### रोटरी क्लबतर्फे रक्तदान शिबिर



**पनवेल :** रोटरी क्लब पनवेल ईलाईट टाऊन च्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर हा उपक्रम झाला. यावेळी अध्यक्ष निलेश पोटे यांनी ६८ वे रक्तदान केले. यावेळी मोठ्या प्रमाणात सदस्यांनी रक्तदान करून वर्धापन दिन साजरा केला.

### आपटा मोहल्ला येथे इफ्तार पार्टी



**पनवेल :** आपटा मोहल्ला येथे उपसरपंच असद पिठ्ठु व मित्र परिवार बाबू सय्यद अरफात दळवी शारिक घरतकर काशीब पिठू नौमानमुल्ला आरसालान दळवी उमेर मुल्ला अरबाज भाटकर तर्फे इफ्तार पार्टी चा आयोजन करण्यात आला. मोहल्लातील ग्रामस्थ व माजी जि. प सदस्य ज्ञानेश्वर घरत, पंचायत समिती सदस्य मयूर शेलार, माजी सरपंच दत्ता पाटिल, महेंद्र भोईर, केळवणे पंचायत समिती भाजप अध्यक्ष सुशील ठाकूर, दामू माडे, दर्शन भोईर आदी उपस्थित होते.

# पनवेल, खारघरमध्ये कारच्या काचा फोडून चोऱ्या

## एका तासात चार वाहनांमध्ये डल्ला



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर आणि खारघर परिसरात कारच्या काचा फोडून चोरी करणाऱ्या टोळीने डोके वर काढले असून, एका तासाच्या कालावधीत चार ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, या घटनांमध्ये एकूण सुमारे ८३ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची नोंद आहे.

नवी मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (ता. १६) दुपारी तीन ते चार या वेळेत पनवेल शहरामधील गांधी रुग्णालय, पाटील रुग्णालय आणि ठाणा नाका येथील क्राऊन हॉटेलसमोर उभ्या असलेल्या मोटारींना चोरट्यांनी लक्ष्य केले. तिन्ही ठिकाणी मोटारींच्या मागील डाव्या बाजूच्या काचा फोडून त्यामधील बॅगा चोरी करण्यात आल्या. या बॅगांमध्ये दोन लॅपटॉपसह अन्य साहित्य होते. याच दिवशी खारघर येथील सेक्टर २३ मधील इस्कॉन मंदिरासमोरील रस्त्यावरही अशाच प्रकारची घटना घडली. एका ३० वर्षीय वाहनचालकाने सायंकाळी पावणे सहा वाजता आपली मोटार उभी केली होती. काही वेळाने परत आल्यावर मोटारची मागील डाव्या बाजूची काच फोडून बॅग चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. या बॅगेत लॅपटॉप, मोबाईल व इतर साहित्य मिळून सुमारे २३ हजार रुपयांचा ऐवज होता.

या चारही प्रकरणांची नोंद पनवेल शहर आणि खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे. यापूर्वी महामार्गावरील ढाबे व हॉटेल परिसरात सक्रिय असलेली ही टोळी आता शहरातही शिरकाव करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.दरम्यान, वाढत्या रस्ते गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असून, विशेषतः महिलांनी सकाळच्या फिरण्यासाठी बाहेर जाणे टाळण्यास सुरुवात केली आहे. पोलिसांनी गस्त वाढवून अशा गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## ९.८७ लाखांचा बनावट माल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

विविध कंपन्यांचे लोगो व ट्रेडमार्कचा गैरवापर करून बनावट साहित्य साठवून ठेवून विक्री करण्याच्या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत ९ लाख ८७ हजार ५२३ रुपयांचा बनावट माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी राजेश रघू चाम्रिया (रा. नौपाडा, कामाठे, भगत चाळ) यांच्याविरोधात कामोठे पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

कामोठे पोलिस ठाणे हद्दीतील नौपाडा गाव परिसरात विविध कंपन्यांचे लोगो आणि ट्रेडमार्क पिन्द्रहांचा वापर करून बनावट उत्पादने साठवून विक्रीशाली ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुलार ईआयपीआर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे अधिकारी आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत नौपाडा येथे धाड टाकली कारवाईदरम्यान आरोपी राजेश चासिया यांला गोडाऊन उघडण्यास सांगितले असता तेथे विविध कंपन्यांच्या नावाने बनावट उत्पादने साठवून ठेवलेली आढळली, तपासणीअंती १ लाख ८० हजार ५२३ रुपयांचा बनावट माल जप्त केला.

गेल्या काही दिवसांपासून बनावट वस्तूंची विक्री होत असल्याच्या तक्रारी परिसरातील नागरिकांकडून करण्यात कैत असून याप्रकरणी पोलिस तपास करीत आहेत.

## उरणमध्ये अपघातात एकाचा मृत्यू

**उरण : बातमीदाक्षर**

उरण तालुक्यातील न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गणेश बेंझोप्लास्ट कंपनीच्या समोरील रस्त्यावर जेएनपीटीकडून पीयूबी इमारतीकडे जाण्याच्या वाय जंक्शन रोडवर मोठा अपघात झाला आहे. या अपघातात सुषिलकुमार भैय्यालाल यादव (वय ३३ वर्षे व्यवसायाने चालक, राहणार अहीरोली, कुथुपूर, मढीयाहूं, जि. जौनपूर, राज्य उत्तरप्रदेश) यांचा अपघातात मृत्यू झाला आहे. हा अपघात इतका भयंकर स्वरूपाचा होता की, अपघतामध्ये सुषिलकुमार यादव याचे शीर धडापासून वेगळे झाले होते.

अपघाताची माहिती पोलीस कर्मचारी गणेश बासरे यांनीं न्हावाशेवा पोलीस ठाण्यात दिली असता कोणताही विलंब न लावता न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे एपीआय श्रीकांत नायडू यांनी आपल्या सहकाऱ्या समवेत घटनास्थळाला भेट दिली. मृत व्यक्तीच्या अंगावर आधार कार्ड, अनुज्ञप्ती आणि वन प्लस कंपनीचा मोबाईल सापडला घटनेची प्राथमिक तपासणी नायडू यांनी करून अज्ञात वहानाने सदरच्या व्यक्तीस जोरदारपणे ठोकर मारून कोणत्याही प्रकारची माहिती न देता पळून गेला असल्याचे नमूद करून उपचारासाठी दाखल केले असता येथील डॉक्टरानी त्यास दाखलपूर्व मयत म्हणून घोषित केले. न्हावाशेवा पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली असून न्हावाशेवा पोलीस या अपघाताचा अधिक तपास करीत आहेत.

## सायबर भामट्याकडून १९ लाखांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डिफेन्समधून बोलत असून तुमच्या नावावर सहा आधार कार्ड दिसत आहेत आणि त्यावर चारशे कोटींचा फ्रॉड झालेला दिसत आहे, यातून बाहेर निघण्यासाठी पैसे पाठवा असे सांगून १९ लाख २० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात १२ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

रंजना देवपूरकर या सेक्टर ३४, खारघर येथे राहत असून त्यांना जयस्वाल नामक ईसमाने व्हाट्सअपवर कॉल करून तो डिफेन्समधून बोलत असल्याचे सांगितले आणि तुमच्या नावावर सहा आधार कार्ड दिसत आहे. त्यावर चारशे कोटींचा फ्रॉड झालेला दिसत आहे आणि ते तुमच्या नावावर घेतले असल्याचे सांगितले. हा प्रकार नाशिकमधील असून जयस्वाल यांनी त्यांना वारंवार व्हिडिओ कॉल, व्हाट्सअप कॉल केले.

घरात कोणाला सांगितले तर तुमच्या मुलीला अटक करू असे सांगून व्हिडिओ कॉल केले आणि पोलिसाच्या ड्रेसमध्ये पाच ते सहा जण बसलेले दिसत होते. त्यानंतर त्यांनी सांगितलेल्या खात्यामध्ये तेरा लाख वीस हजार रुपये पाठवले. यावेळी दोन दिवसांनी आम्ही दोघांना पकडले आहे असे समोरील इसमाने सांगितले. आणखी काही लोक पकडायचे आहे त्यासाठी सहा लाख रुपये आणखी पाठवले. यांनी आणखी पैशांची मागणी केली यावेळी त्यांनी सगळा प्रकार मुलीला सांगितला. हे सर्व खोटे असून ते फसवत आहेत असे मुलीने सांगितल्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली.

## कोळसा, इलेक्ट्रिक शेगड्यांना मागणी



### लाकडाच्या किमतीत वाढ

**मागणी वाढल्याने लाकडांच्या दरातही वाढ झाली आहे. पूर्वी ४ ते ५ रुपये किलो दराने मिळणारे लाकूड आता ८ ते १२ रुपये किलो दराने विकले जात आहे. उद्भवलेल्या संकटामुळे खवय्यांना मात्र अस्सल चुलीवरची चव चाखायला मिळत आहे. मात्र गॅसटंचाईअभावी हॉटेल व्यावसायिकांची आर्थिक गणित बिघडले आहे.**

**पनवेल : वार्ताहर**

गॅस तुटवड्यामुळे लाकूड, कोळसा आणि ईलेक्ट्रिक शेगड्यांची मागणी वाढली आहे. पनवेल शहरात ढाबाचालकांनी लाकडाच्या चुलीचा आधार घेत काही दिवसांपासून चुलीवर जेवण तसेच इतर खाद्यपदार्थ बनवण्यास सुरुवात केली आहे. शहरांमध्ये गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे हॉटेल आणि घरगुती स्वयंपाकासाठी पर्यायी इंधनाचा वापर वाढला आहे.

गॅसपुरवठा बंद झाल्याने काही व्यवसाय सध्या बंद आहेत. पनवेल संपूर्ण तालुक्यात जवळपास ५० पेक्षा जास्त लहान-मोठे ढाबे असून त्यांच्यावर गॅस तुटवड्यामुळे संकट ओढवले आहे. वीकेण्डला खास आगरी पद्धतीच्या जेवणाच्या बेतासाठी अनेकजण ढाबे गाठतात, मात्र गॅस सिलिंडरच उपलब्ध होत नसल्याने अनेक व्यवसाय बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. यावर उपाय म्हणून हॉटेलमालकांनी चुलीवरच्या जेवणाचा पर्याय स्वीकारला आहे. गॅसच्या तुटवड्यामुळे लाकूड आणि कोळशाच्या दरातही २० ते ३० टक्के वाढ झाली आहे.



हॉटेल आणि खानावळीत लाकूड-सरपण, कोळसा आणि पारंपरिक शेगड्यांचा वापर सध्या वाढला आहे. ईलेक्ट्रिक शेगड्यांची मागणी अचानक वाढली असून दुकाने आणि ऑनलाईन विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या झळा आता सर्वसामान्यांना बसू लागल्या आहेत.

**गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने व्यवसाय बंद न ठेवता लाकडांच्या आधारे चूल पेटवण्याचा निर्णय आम्ही घेतला. यामुळे जेवणाची चव वाढतेच, ग्राहकदेखील समाधानी होत आहेत. गॅसच्या तुलनेत यासाठी मेहनत जास्त असली तरी ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी चार दिवसांपासून आम्ही ग्राहकांना चुलीवरचे जेवण देत आहोत.**

**–संजय पोपेटा, ढाबाचालक, पनवेल**

## महापौर नितीन पाटील यांच्याकडून प्रभाग १९मध्ये विकासकामांचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी प्रभाग क्रमांक १९ मधील लोकमान्य टिळक रस्ता परिसरात सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी पाहणी दौरा केला. स्थानिक नगरसेविका रुचिता लोंढे यांनी या दौऱ्याचे आयोजन केले होते.

या भेटीदरम्यान महापौरांनी रस्त्याच्या कामाची सद्यस्थिती आणि कामाचा दर्जा याची बारकाईने पाहणी केली. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या. या पाहणी दौऱ्यावेळी अभिषेक पटवर्धन, रूपेश नागवेकर, शहर अभियंता संजय कटेकर, सुधीर साळुंखे यांच्यासह अन्य मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खुटारी आणि पनवेल भाजप ओबीसी सेलचे अध्यक्ष नंदकुमार चंद्रकांत म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच नगरसेविका लीना नंदकुमार म्हात्रे यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले.



या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील अनेक नागरिकांनी आपल्या आरोग्याची अत्याधुनिक मशीनद्वारे तपासणी करून घेतली. सध्याच्या धावपळीच्या युगात आरोग्य तपासणी ही अत्यंत खर्चीक बाब बनली आहे. सर्वसामान्य नागरिकांना आपल्या शरीराच्या सद्यस्थितीची माहिती व्हावी आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रविवारी सकाळी१० ते दुपारी ३ या वेळेत भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालय, खुटारी येथे हे शिबिर संपन्न झाले.

## उरणमध्ये आज रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

ओएनजीसी उरण प्लांट सौजन्याने व पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण आयोजित बुधवारी (दि. १८) मार्च रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत, द्रोणागिरी भवन, ओएनजीसी उरण उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे

उद्घाटक प्रमुख पाहुणे समूह महाव्यवस्थापक, संयंत्र व्यवस्थापक उरण एस.एन.अहमद, महाव्यवस्थापक प्रमुख मानव संसाधन भावना आठवले, सरचिटणीस पीईयु मुंबई संदीप रेवणकर, माजी सरचिटणीस पीईयु मुंबई, संतोष पाटील, संयंत्र समाधान मढवी, संयंत्र व्ही. डी. घरत, जि. आर.घरत, विवेक पाटील, गोविंद घरत, युनियन पदाधिकारी, कर्मचारी, सदस्य आदींचे सहकार्य मिळणार आहे, असे पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण सेक्रेटरी विलेश घरत यांनी सांगितले.

रक्तदान शिबिरास एमजीएम हॉस्पिटल कामोठे, अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई, रिलायन्स हॉस्पिटल कोपरखैरणे, महात्मा गांधी सेवा मंदिर मुंबई, सेंट जॉर्ज हॉस्पिटल मुंबई आदी हॉस्पिटलचे सहकार्य मिळणार आहे.

## कळंबोलीत नववर्षाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी

**कळंबोली : बातमीदार**

गुढी पाडव्याचा सण काही दिवसांवर आला आहे. मराठी नववर्षाची सुरुवात करणारा हा सण भव्य-दिव्य साजरा करण्यासाठी नवी मुंबईकर सज्ज झाले आहेत. शोभा यात्रा' किंवा 'नववर्ष स्वागत यात्रा' ही शहरातील गुढी पाडव्याच्या उत्सवातील सर्वात आकर्षक वैशिष्ट्या पैकी एक आहे.



हिंदू कॅलेंडरनुसार, दरवर्षी चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीपासून हिंदू नववर्ष सुरू होते. हिंदू नववर्ष, प्रामुख्याने महाराष्ट्रात गुढीपाडवा म्हणून साजरे केले जाते. गुढी पाडव्याला भारतातील दक्षिणेकडील राज्यांमध्ये उगादी म्हणूनही ओळखले जाते. गुढी पाडवा हा दोन शब्दांपासून बनलेला आहे. गुढी या शब्दाचा अर्थ विजय ध्वज आणि पाडवा म्हणजे प्रतिपदा तिथी.ती विजय, समृद्धी आणि शुभारंभाचे प्रतीक मानली जाते.

चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्ष प्रतिपदेला येणाऱ्या गुढी पाडव्याच्या निमित्ताने विजय ध्वज म्हणून गुढी सजवतात आणि हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. नवी मुंबईतील कळंबोली शहरात गुढीपाडवा सांस्कृतिक व सामाजिक सेवा संस्था यांच्या वतीने नववर्षाच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली आहे, या निमित्ताने विवीध कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत. या कार्यक्रमात सर्वांनी उत्साहात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे सचिव उध्दव कदम यांनी केले आहे.

नववर्षाच्या स्वागतासाठी गुढीपाडवा सांस्कृतिक व सामाजिक सेवा संस्था सज्ज झाली असून त्यानुसार विविध स्पर्धा व आकर्षक कार्यक्रम सेक्टर ६ मधील प्रांगणात, कळंबोली येथे होणार आहे. तारीख १८ ,सायंकाळी ७ ते ९ लहान लहान मुलांसाठी नृत्य स्पर्धा, रात्री ९ ते १० रांगोळी स्पर्धा लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांसाठी खुली आहे.

गुरुवारी तारीख १९ सकाळी मुख्य कार्यक्रम असून, सकाळी ७ वाजता गुढीचे पूजन, ८ वाजता भव्य शोभा यात्रा, ११.३० वाजता मुख्य पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिके व मान्यवरांचा सन्मान, दुपारी महाप्रसाद या कार्यक्रमात महिला, पुरुष तसेच लहान मुलांनी पारंपरिक पद्धतीने पोषाख परिधान करून मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी अशी विनंती संस्थेच्या वतीने उत्सव कमिटी अध्यक्ष दत्ता गडाख यांनी केली आहे.

## गुळसुंदे येथे श्रीराम मारुती जन्मोत्सव

**रसायनी :** प्रतिवर्षाप्रमाणे १९ मार्च ते ३ एप्रिल २०२६ पर्यंत श्रीराम मारुती जन्मोत्सव गुळसुंदे येथे साजरा होणार आहे.

या कालावधीत कीर्तने, पालखी सोहळा, यज्ञ, प्रसाद, हळदीकुंकू समारंभ व ललिता प्रित्यर्थ नाट्य प्रयोग इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. असे विविध कार्यक्रम यावेळी होत असून हनुमान जन्माचे किर्तन होणार आहे व श्रींची पालखी होणार आहे. यावेळी या आजूबाजूला गावातील सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने नाटक पाहण्यासाठी येत असतात. अतिशय मोठ्या उत्साहात भक्ती भावाने हा उत्सव साजरा होत असतो.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नगरसेविका दर्शना भोईर यांनी शहरातील भारत गॅस एजन्सीच्या कार्यालयात जाऊन सुयोग वारंगे यांची भेट घेत कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांना गॅसपुरवठ्याचे काम सुरळीत आणि गर्दीविरहित पार पडत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे नगरसेविका भोईर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, पनवेलमध्ये गॅस वितरण व्यवस्थित सुरू असून कोणत्याही रांगा नाहीत. नागरिकांनी गॅस ऑनलाईन बुकींग करावा. सिलिंडर घरपोच मिळेल. आढावा घेतेवेळी भोईर यांच्यासोबत सपना पाटील, अरुणा पाटील, कविता पाटील, स्वप्नील शिगवण, बाळाराम पाटील आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# बेकायदा धर्मांतराला चाप

फसवणूक, बळजबरी किंवा विवाहाच्या आमिषाने होणाऱ्या धर्मांतरापासून नागरिकांचे संरक्षण व्हावे याकरिता राज्यातील महायुती सरकारने मांडलेले ऐतिहासिक 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' हे विधेयक सोमवारी विधानसभेत बहुमताने मंजूर झाले. केवळ धर्मांतराच्या हेतूने केलेला विवाह न्यायालयाद्वारे रद्दबातल करण्याची तरतूद या विधेयकात आहे. तसे झाल्यास संबंधितांच्या अपत्याला आईचाच धर्म मिळणार आहे. अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे आता देशातील १३वे राज्य ठरणार आहे.

**कोणीही जबरदस्तीने किंवा कुणाच्या असहायतेचा फायदा घेऊन, प्रलोभन दाखवून वा फसवणुकीने धर्मांतर करता कामा नये. अशा बेकायदा धर्मांतराला चाप लावण्याच्या हेतूने राज्यातील महायुती सरकारने मांडलेले ऐतिहासिक 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' हे विधेयक सोमवारी रात्री विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले. आमिष दाखवून किंवा दहशत-जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्यांना या विधेयकात सात ते दहा वर्षांचा कारावास आणि एक ते सात लाख रुपयांच्या दंडाची कठोर तरतूद करण्यात आली आहे. विधेयकाला शिवसेना ठाकरे गटाने समर्थन दिले तर काँग्रेस, माकप, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि समाजवादी पक्षाने विरोध केला. सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये बेकायदा धर्मांतरप्रकरणी प्रभावी कारवाई करण्यासाठी सुस्पष्ट तरतुदी नाहीत. त्यामुळे बळजबरीच्या धर्मांतराविरोधात राज्यात अनेकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतानाही दिसतो. यासंदर्भात सुस्पष्ट असा हा कायदा आणण्याच्या हेतूने हे विधेयक आणण्यात आले आहे. धर्मस्वातंत्र्य हा विषय राज्याच्या अखत्यारित येत असल्याने वेगवेगळी राज्ये याबाबत निर्णय घेत आहेत. १९६८ पासून असे कायदे देशात होत आले असून अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे आता देशातील १३वे राज्य ठरणार आहे. यापूर्वी ओडिशा, कर्नाटक, हरयाणा, राजस्थान व अरुणाचल प्रदेश आदी राज्यांत असा कायदा करण्यात आला आहे. हे विधेयक कुठल्याही एका धर्माच्या विरोधात नसून ते सर्व धर्मांना लागू आहे. त्यामुळे कुठल्याही प्रौढ व्यक्तीचा धर्मांतरणाचा हक्क हिरावून घेतला जाणार नाही. संविधानाच्या कलम २५ ने प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. प्रत्येकाला धर्मप्रसाराचा अधिकारही आहे. मात्र धर्मप्रसाराला सर्वोच्च न्यायालयाने काही मर्यादाही घालून दिल्या आहेत. 'धर्मस्वातंत्र्य' विधेयक कुणी धर्मांतर करू नये यासाठी नसून बळजबरी, फसवणूक यांद्वारे होणाऱ्या बेकायदा धर्मांतरापासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी ते आहे. धर्मांतर बळजबरीने करण्यात येऊ नये यासाठी ते करण्यापूर्वी ६० दिवसांची नोटीस बंधनकारक असेल. सक्षम प्राधिकरणाने हे धर्मांतर स्वेच्छेने होत असल्याची खात्री करावी लागेल. धर्मांतर केल्यावर २१ दिवसांत तसे जाहीर करावे लागेल कारण प्रशासकीय नोंदीसाठी ते आवश्यक असेल. कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करून धर्मांतर झाल्याचे लक्षात आल्यास कारवाई करण्यात येईल. एखाद्या व्यक्तीचे जबरदस्तीने धर्मांतर केल्यास संबंधित व्यक्तीचे आईवडील, भाऊ, बहीण, वैवाहिक, रक्ताचे वा दत्तक नाते असलेल्या कुठल्याही व्यक्तीला त्याबाबतची तक्रार देता येईल. अनेकदा बेकायदा धर्मांतर होऊन लग्न होते आणि नंतर ते लग्न टिकत नाही. आंतरधर्मीय विवाह मोडल्यास त्यातून बालकाच्या धर्माचे व ताब्याचे जे प्रश्न निर्माण होतात, ते या कायद्यामुळे आता होणार नाहीत. बेकायदा धर्मांतरणानंतर बालक जन्माला आल्यास यापुढे त्याला त्याच्या आईच्या धर्माचे मानण्यात येईल. तसेच आईवडिलांच्या मालमत्तेत उत्तराधिकार मिळवण्याचा त्याचा हक्क कायम असेल आणि बाळाचा ताबा आईकडे असेल.**

# आधुनिक काळात समाजकार्य देखावा बनून राहू नये



जगातील महान समाजसुधारकांची नावे आपल्या मनात येताच, त्यांच्याबद्दल आदर आणि श्रद्धेने आपण भरून जातो, कारण त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी संघर्षाचे जीवन जगले, अपार वेदना, दुःख सहन केले आणि कठीण परिस्थितीशी झुंज दिली. स्वतःची पर्वा न करता, त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत लोकांच्या हक्कांसाठी, मानवतेसाठी, समानतेसाठी, एकतेसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी काम केले. त्यांना लोकांच्या समस्या आणि त्यांच्या वेदना जाणवल्या आणि त्या वेदना सुद्धा त्यांनी जगल्या. भेदभाव, जातीयवाद, लिंगभेद, वर्णव्यवस्था, अन्याय, सामाजिक विसंगती आणि कुप्रथा अशा अनेक वाईट गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. आज प्रत्येक व्यक्तीला असलेले अधिकार हे त्या समाजसुधारकांच्या कठोर परिश्रमाचे फळ आहेत. प्राण्यांपेक्षाही वाईट परिस्थितीतून जात मानव आजच्या या स्थितीत पोहोचला आहे. अनादी काळापासून, सती प्रथा, देवदासी प्रथा, अस्पृश्यता, चेटकीण शिकार, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्री जननेंद्रियाच्या विच्छेदनाची प्रथा, स्त्री भ्रूणहत्या यासारख्या भयानक प्रथा भारतात प्रचलित सामाजिक दुष्कृत्ये होती. महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते, पितृसत्ताक व्यवस्था प्रबळ होती. खालच्या जाती आणि स्त्रियांना प्राण्यांपेक्षाही वाईट मानले जात असे. शतकानुशतके चालत आलेल्या अशा दुष्ट प्रथांचे अत्याचार आणि दडपशाही थोर समाजसुधारकांनी थांबवली. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी देशात स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मचाऱ्यांना आणि महिलांना हक्क दिले आणि वंचितांना समान दर्जा दिला. पंडिता रमाबाईंनी बालविवाह थांबवण्यासाठी आणि महिला व विधवांच्या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी काम केले. राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, भूदानचे प्रणेते विनोबा भावे, पेरियार ई.व्ही. रामास्वामी, कबीर, रविदास, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, फातिमा शेख, स्वर्णकुमारी देवी, सिस्टर निवेदिता, कादंबिनी गांगुली, धोंडो केशव कर्वे, मदर तेरेसा, बाबा आमटे, सिंधुताई सपकाळ यांच्यापासून ते वर्तमानातील मेधा पाटकर, इरोम शर्मिला, सोनम वांगचुक सारखे अनेक त्यांच्या वेगवेगळ्या सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांसारख्या अनेक संतांनीही देशाच्या सामाजिक विकासात अमूल्य योगदान दिले आहे. आजही, देशातील काही अनामिक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याद्वारे मानवता आणि समाजाचा विकास करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला आहे. प्रत्येकजण स्वतःसाठी जगतो, पण जे स्वत: अगोदर दुसऱ्यांचा विचार करतात, लोकांसाठी निस्वार्थपणे जगतात आणि जे स्वतःच्या प्रसिद्धीसाठी कधीही स्वतःचे रणशिंग वाजवत नाहीत त्यांना खरे समाजसेवक म्हणतात.

दरवर्षी मार्च महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी जगभरात जागतिक सामाजिक कार्य दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२६ च्या जागतिक सामाजिक कार्य दिनाची थीम 'सामाजिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी नुतनीकृत वचनबध्दता' ही थीम दोहा परिषदेनंतरच्या संदर्भात सामाजिक विकास आणि न्यायासाठी नविन प्रयत्नांवर भर देते. दारिद्र्यनिर्मुलन , पुर्ण रोजगार आणि सामाजिक समावेश हे यातील प्रमुख क्षेत्र आहेत. हा उत्सव सामाजिक संरचनात्मक असमानता, श्रमबाजारातील अनौपचारिकपणा आणि लैंगीक असमानता दूर करण्यावर भर देतो. सामाजिक कार्य जीवनात सुसंवाद, समता आणि मानवी विकास कल्याण यावर लक्ष केंद्रित करते. थोर लोक नेहमी म्हणायचे की जर तुम्ही सामाजिक कार्य करताय किंवा निःस्वार्थपणे लोकांना मदत केली तर कोणालाही ते कळू देवू नका, ते अशा प्रकारे करा, जेणेकरून सेवा घेणाऱ्या व्यक्तीला लाज किंवा संकोच वाटू नये आणि आपल्यात देखील अहंकार निर्माण होऊ नये. चांगली कर्मे करा आणि विसरून जा, आपण शरीराने, मनाने, पैशाने किंवा ज्ञानाने सक्षम असू, तर आपण कोणत्याही अपेक्षा न ठेवता आपल्या क्षमतेनुसार असहाय्यांना मदत केली पाहिजे. चांगल्या कामांचे नेहमीच कौतुक केले पाहिजे, जेणेकरून इतरांनाही प्रेरणा मिळेल, दिखाऊपणा अजिबात नसावा. माउंटेनमैन दशरथ मांझी, एक अत्यंत सामान्य वृद्ध, गरीब ग्रामीण कामगार, त्यांनी २२ वर्षांच्या अथक संघर्षातून एकट्याने डोंगर तोडून लोकांसाठी मार्ग तयार करून इतिहास रचला. त्यांचे कुटुंब गरिबीत जगले, परंतु त्यांनी कधीही कोणाकडूनही अपेक्षा केल्या नाहीत. आजही देशात आणि जगात असे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत जे अगदी सामान्य जीवन जगतात पण त्यांचे कार्य असाधारण आहे. आजच्या काळात, प्रामाणिकपणे कष्ट करून पैसे कमवून असहाय्यांना मदत करणारा माणूस शोधणे खूप कठीण आहे.

आपल्या देशात निवडणुकीच्या वेळी राजकारणी कोट्यवधी रुपये पाण्यासारखे खर्च करतात जेणेकरून निवडणूक जिंकल्यानंतर ते गरीब लोकांची निःस्वार्थपणे सेवा करू शकतील. ते लोकांच्या कल्याणासाठी सर्वस्व त्याग करण्याबद्दल बोलतात, नेत्यांना पक्ष बदलावे लागले तरी ते असे स्पष्टीकरण देतात की, ते फक्त लोककल्याणासाठी असे करत आहेत, त्यांना कसलाही सत्तेचा लोभ नाही आहे. आज प्रत्येक क्षेत्रात, सर्वत्र सामाजिक कार्यकर्त्यांचा पूर आलेला आहे. कोणतीही व्यक्ती, कधीही, च्या आपल्या नावापुढे सामाजिक कार्यकर्ता हा शब्द जोडतो आणि विविध कार्यक्रमादरम्यान, ते रस्त्याच्या चौकात, ट्रॅफिक सिग्नलवर, गल्लोगल्ली सामाजिक कार्यकर्त्याच्या नावाने अनेक बॅनर-बोर्ड लावतात, वर्तमानपत्रांमध्ये त्यांचे संदेश प्रकाशित करतात. सध्या बॅनर-बोर्डांवर, सोशल मीडियावर अल्पवयीन मुले ही सामाजिक कार्यकर्ते म्हणून स्वतःचे फोटो लावतात. लोककल्याणासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांऐवजी आजकाल फक्त छायाचित्र काढणाऱ्या कार्यकर्ते च जास्त दिसून पडतात.

सर्व समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते किंवा आपणही, समाजाच्या समस्यांचे गांभीर्य समजून घेत आपल्या क्षमतेनुसार जागरूकता व निःस्वार्थ सेवा करायला सुरुवात केली, तर देशातून प्रत्येक समस्या दूर होऊ शकते.

**-डॉ. प्रितम गेडाम**

# जगातील एक सर्वोत्तम क्षेत्ररक्षक एकनाथ सोलकर

मुंबई येथे १८ मार्च १९४८ रोजी जन्मलेले एकनाथ धोंडू सोलकर हे एका गरीब कुंटुंबातून आले होते. त्यांचे वडील मुंबईतील हिंदू जिमखाना येथे ग्रांउन्ड्समन होते. त्या वेळी सोलकर हे त्यांच्या वडिलांसोबत क्रिकेटच्या सामन्यादरम्यान धावफलक बदलण्याचे काम करत असत. १९६० आणि १९७०च्या दशकात त्यांच्या अपवादात्मक क्षेत्ररक्षण कौशल्यासाठी आणि संघातील योगदानासाठी ओळखले जाणारे एक भारतीय क्रिकेटपटू होते. सोलकर हे केवळ एक विश्वासार्ह अष्टपैलू खेळाडू नव्हते; तर भारताच्या क्रिकेट इतिहासातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते.

१९६९मध्ये इंग्लंडविरुद्ध भारताकडून सोलकरने कसोटी पदार्पण केले आणि मैदानावर एक प्रतिष्ठित खेळाडू म्हणून स्वतःला स्थापित करण्यास त्याला जास्त वेळ लागला नाही. फलंदाज आणि मध्यमगती गोलंदाज म्हणून त्याची प्राथमिक भूमिका त्याच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षण क्षमतेने पूरक होती, ज्यामुळे तो खेळाच्या तिन्ही पैलूंमध्ये एक संपत्ती बनला. एकनाथ सोलकर यांच्या कारकिर्दीतील एक निर्णायक क्षण १९७१च्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत आला. त्यांच्या कामगिरीने, विशेषतः बॅटने आणि फिल्डिंगमध्ये, इंग्लंडमध्ये भारताच्या ऐतिहासिक कसोटी मालिकेच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. सोलकर यांनी लवचिकता आणि दृढनिश्चय दाखवला, बॅटने महत्त्वपूर्ण धावा केल्या आणि काही उत्कृष्ट झेल घेतले ज्यामुळे सामन्यांचा कल बदलला.

सोलकरचा निर्भय दृष्टिकोन आणि आव्हानात्मक परिस्थितींना तोंड देण्याची तयारी यामुळे तो क्रिकेटप्रेमींमध्ये आवडता खेळाडू बनला. त्याच्या खेळण्याच्या शैलीने कधीही हार न मानण्याची वृत्ती दर्शविली आणि खेळाला त्याच्या संघाच्या बाजूने वळवण्याची त्याची क्षमता त्याला क्रिकेट जगतात प्रचंड आदर मिळवून देत असे.सोलकर त्याच्या क्षेत्ररक्षणाच्या महत्त्वाबद्दल भारतीय क्रिकेटपटूंच्या मानसिकतेवर पडणाऱ्या प्रभावासाठी देखील लक्षात ठेवले जातात. मधुमेहामुळे वयाच्या ५७व्या वर्षी २६ जून २००५ रोजी मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)




## इन्स्टाग्रामवर डीएम् शेड्युल करता येणार

अल्पवाधीत तरुणांच्या आणि नेटकऱ्यांच्या गळ्यातील ताईत बनलेल्या इन्स्टाग्रामवर सातत्याने नवनवे बदल होत आहेत.




वापरकर्त्यांना सोयीचे आणि उपयुक्त ठरतील असे बदल सातत्याने केले जातात. त्यामुळे व्हिडिओ, मिम्स आणि फोटो शेअर करण्यासाठी इन्स्टाग्राम प्रसिद्ध आहे. आता इन्स्टाग्रामने नवं फिचर आणलं आहे. यामुळे वापरकर्ते डीएम शेड्युल करू शकणार आहेत.

इन्स्टाग्रामवर मेसेज शेड्युल करण्याची सोय केल्याने याचा फायदा बऱ्याच वापरकर्त्यांना होणार आहे. विशिष्ट वेळी मिम्स शेअर करू इच्छिणाऱ्या किंवा विशिष्ट वेळी प्रेक्षकांशी संवाद साधू इच्छिणाऱ्या कंटेट क्रिएटर्सना या फिचरचा फायदा होणार आहे. त्यामुळे, इन्स्टाग्रामवर मेसेज कसा शेड्युल करायचा हे जाणून घ्यायचं असेल तर खाली आम्ही तुम्हाला सोपी पद्धत सांगत आहोत.

### इन्स्टाग्रामवर डीएम कसं शेड्यूल करायचं?

- इन्स्टाग्राम सुरू करा आणि होम स्क्रीनवरून उजवीकडे स्वाइप करून किंवा वरच्या उजव्या कोपऱ्यातील मेसेज पर्यायावर टॅप करून डायरेक्ट मेसेजेस (DMs) विभागात जा. आता, तुम्हाला ज्या संभाषणासाठी मेसेज शेड्युल करायचा आहे, त्यांचा टेक्स्ट बॉक्स उघडा.
- त्या टेक्स्ट बॉक्समध्ये जे टाईप करायचं आहे, ते टाईप करून घ्या.
- सेंड बटण दाबण्याऐवजी, त्यावर जास्त वेळ दाबा आणि एक नवीन मेसेज शेड्यूल करा पर्याय दिसेल.
- येथे, तुम्हाला संदेश पाठवायचा असलेली तारीख आणि वेळ सेट करा आणि पूर्ण झाल्यावर निळ्या बटणावर टॅप करा.
- इन्स्टाग्राम तुम्हाला २९ दिवस आधी मेसेज शेड्यूल करण्याची परवानगी देतो आणि तुम्ही चॅट उघडता तेव्हा प्रत्येक वेळी संभाषणाच्या तळाशी एक लहान शेड्यूल्ड मेसेज बॅनर दाखवेल. जर तुम्ही त्यावर टॅप केले तर एक नवीन स्क्रीन उघडेल जिथे तुम्ही तुमचे सर्व शेड्यूल केलेले मेसेज पाहू शकता.
- सोशल मीडिया ॲप इन्स्टाग्रामची मालकीही मार्कस झुकेरबर्ग याच्याकडे आहे. त्यांची कंपनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर नवनवीन फिचर्स आणत असतात, जेणेकरून युझर वापर करून टिकू शकतील.

# ख्यातनाम अभिनेता शशी कपूर



## निमित्त

हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम अभिनेते शशी कपूर त्यांचे मूळ नाव बलबीर राज होय. त्यांचा जन्म कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध अभिनेते पृथ्वीराज कपूर आणि मातोश्री रामसरनी कपूर. चित्रपट व नाट्यकलेशी निगडीत असणाऱ्या नामांकित कपूर घराण्यात जन्म झाल्यामुळे अभिनयकलेचा व चित्रपटाचा समृद्ध वारसा शशी कपूर यांनाही लाभला. आज त्यांचा जन्मदिन आहे. त्यांच्या विषयी खास लेख-


माटुंगा, मुंबई येथील 'डॉन बॉस्को' हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. १९४८ च्या राज कपूरनिर्मित आणि दिग्दर्शित आग या चित्रपटात बालकलाकाराची भूमिका करून त्यांनी चित्रपटांत पदार्पण केले. त्यानंतरच्या १९५१ मध्ये आलेल्या आवारा या चित्रपटात त्यांनी त्यांच्या जेष्ठ बंधूची, राज कपूर यांची कुमारावस्थेतील भूमिका वठवली. १९५४ पर्यंत त्यांनी बालकलाकार म्हणून काही चित्रपटांत कामे केली. त्यानंतर ते त्यांचे वडील पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटर या रंगभूमीशी निगडीत मंडळाशी जोडले गेले.

ख्यातनाम अभिनेते सुनील दत्त यांच्या पदार्पणाचा पहिला चित्रपट असलेल्या पोस्ट बॉक्स ९९९ या चित्रपटासाठी शशी कपूर यांना साहाय्यक दिग्दर्शक म्हणून संधी मिळाली. त्यानंतर १९६१ पर्यंत गेस्ट हाउस, दुल्हा-दुल्हन, श्रीमान सत्यवादी यांसारख्या चित्रपटांतून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून ते कार्यरत राहिले. १९६१ सालच्या यश चोप्रा दिग्दर्शित बी. आर. चोप्रा निर्मित धर्मपुत्र या चित्रपटातून त्यांनी नायकाच्या भूमिकेत पदार्पण केले. त्यानंतर तब्बल एकशे सोळा हिंदी चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्या. पैकी ६१ चित्रपटांतून ते नायकाच्या भूमिकेत चमकले. शशी कपूर हे केवळ एक चांगले अभिनेतेच नव्हते, तर एक व्यासंगी आणि कलासक्त, विद्रत व्यक्तिमत्त्व होते. स्वतःच्या 'फिल्मवालाज' या चित्रपट निर्मितीसंस्थेद्वारे त्यांनी आशयघन आणि दर्जेदार चित्रपटांची निर्मिती केली. त्यांपैकी १९७८ च्या शाम बेनेगल दिग्दर्शित जुनून या चित्रपटास सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर कलयुग या १९८१ मधील त्यांच्या निर्मितीस त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा फिल्मफेअर पुरस्कार देण्यात आला. त्यांनी निर्मिलेल्या १९८४ च्या उत्सव या, प्राचीन संस्कृत नाटककार शूद्रक यांच्या मृच्छकटिक या नाटकावर आधारित वेगळी वाट चोखाळणाऱ्या, चित्रपटाला देखील सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शनाचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पिता पृथ्वीराज कपूर यांच्या स्मरणार्थ शशी कपूर यांनी जुहू येथे दर्जेदार नाटकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सत्तरच्या दशकात 'पृथ्वी थिएटर'ची स्थापना केली. मुंबईतील एक प्रतिष्ठित असे ते नाट्यगृह आहे. १९९८ साली जिन्नाह आणि साईड स्ट्रीटस् या आंतरराष्ट्रीय चित्रपटात भूमिका केल्यानंतर शशी कपूर यांनी चित्रपट जीवनातून निवृत्ती घेतली. २०१० च्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात त्यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. २०१५ साली शासनाने त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित केले. भारत सरकारने २०११ साली पद्मभूषण या मानाच्या नागरी पुरस्काराने त्यांचा सन्मान केला. शशी कपूर यांना अखेरच्या काळात यकृताच्या विकाराने ग्रासले. त्यांचे याच विकाराने मुंबईत निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### अंडे की दूध? आरोग्यासाठी काय अधिक फायदेशीर...

अंडी किंवा दूध दोन्ही गोष्टींचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते. पण एक प्रश्न जो नेहमीच चर्चेत येतो आहे. ते म्हणजे अंडी की दूध दोघांपैकी कोणते अधिक फायद्याचे असते. या दोन्ही गोष्टींमध्ये भरपूर प्रमाणात पोषक तत्व असतात, जे शरीरासाठी फायदेशीर असतात. अंडी आणि दूध हे दोघांमध्ये प्रथिने मोठ्या प्रमाणात असतात. ज्या लोकांना स्नायूंची वाढ सुधारायची आहे त्यांनी अंडी आणि दूध यांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. या दोन्ही गोष्टींमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, पण अधिक फायद्याचे काय आहे जाणून घेऊयात.



हेल्थलाइनच्या अहवालानुसार एका उकडलेल्या अंड्यामध्ये (१ एसस ) सुमारे ६.३ ग्रॅम प्रथिने, ७७ कॅलरीज, ५.३ ग्रॅम एकूण चरबी, २१२ मिलीग्राम कोलेस्ट्रॉल, ०.६ ग्रॅम कार्बोहायड्रेट, २५ मिलीग्राम कॅल्शियम यासह व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी २, व्हिटॅमिन बी १२, व्हिटॅमिन असते. या शिवाय इ५, फॉस्फरस, सेलेनियमसह अनेक पोषक घटक असतात. विशेष म्हणजे यात कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते, पण त्याचा रक्तातील कोलेस्टेरॉलवर कमी परिणाम होतो आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढत नाही. ज्या लोकांना उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या आहे त्यांनी अंडी खाण्यापूर्वी त्यांच्या डॉक्टरांचा किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

एका कप दूध म्हणजेच २५० ग्रॅम दूधमध्ये. ८.१४ ग्रॅम उच्च दर्जाची प्रथिने, १५२ कॅलरीज, १२ ग्रॅम कार्ब, १२ ग्रॅम साखर, ८ ग्रॅम फॅट, २५० मिलीग्राम कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२, रिबोफ्लेविन, फॉस्फरस आणि इतर अनेक पोषक घटक असतात. दुधात ८८ टक्के पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. दुधात काही प्रमाणात व्हे प्रोटीनदेखील आढळते. प्रथिनांसह दूध कॅल्शियमचा उत्कृष्ट स्त्रोत मानला जातो. विशेष म्हणजे दुधापासून मिळणारे कॅल्शियम शरीरात सहज शोषले जाते. आता जर आपण दूध आणि अंडी यांची तुलना केली तर दोन्ही गोष्टींमध्ये प्रथिने चांगल्या प्रमाणात असतात. पण दुधात अंड्यांपेक्षा जास्त कॅल्शियम असते. अंड्यांमध्ये उच्च कोलेस्ट्रॉल असते, पण ते दुधात नसते. दोन्ही गोष्टींमध्ये कॅलरीजचे प्रमाण फार जास्त नसते आणि ते सेवन करणे सुरक्षित मानले जाते. पण जर तुम्ही शाकाहारी असाल तर दुधाचे मोठ्या प्रमाणावर सेवन करा. पण जर तुम्ही अंडी खात असाल तर तुम्ही आठवड्यातून चार ते पाच अंडी खाऊ शकता. दुसरीकडे तुम्ही दररोज दूध पिऊ शकता, कारण दररोज दूध पिल्याने कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.

# चवदार तळे सत्याग्रहाच्या वर्धापन दिनानिमित्त वीर ते महाड मोफत एसटी सेवा -ना. गोगावले

**महाड : प्रतिनिधी**

२० मार्च रोजी चवदारतळे सत्याग्रहाचा ९९ वा वर्धापन दिन महाड येथे साजरा होणार असून या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहणार आहेत. १९ व २० मार्च रोजी महाड येथे येणाऱ्या भीमसैनिकांची व आंबेडकरी जनतेची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची पूर्ण काळजी शासन व प्रशासन घेईल, अशी ग्वाही महाडचे आमदार व राज्याचे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी दिली.



चवदारतळे सत्याग्रह वर्धापन दिनानिमित्त करावयाच्या उपाययोजनांच्या नियोजनासाठी आज महाड नगरपालिका सभागृहात मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीला समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंढे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक शिवतारे, प्रांताधिकारी पोपट ओमासे, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, तहसीलदार महेश शितोळे, नगराध्यक्ष सुनील कविस्कर, विविध विभागांचे अधिकारी, आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, नगरसेवक व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने आंबेडकरी जनता रेल्वेने येत असते. वीर रेल्वे स्थानकावर उतरल्यावर महाडकडे जाण्यासाठी अनेकांना वाहनांची अडचण भासते. काहींना तब्बल बारा किलोमीटर पायी चालत महाड गाठावे लागते, तर काहींना स्थानकातच रात्र काढावी लागते.ही गैरसोय टाळण्यासाठी वीर रेल्वे स्थानकावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबरोबरच वीर ते महाड आणि महाड ते वीर अशी मोफत एस.टी. बस सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मंत्री गोगावले यांनी सांगितले.

व्यापाऱ्यांना दुकाने सुरू ठेवण्याचे आवाहन शेवटी बोलताना मंत्री गोगावले म्हणाले की, १९ व २० मार्च रोजी महाड येथे येणारी आंबेडकरी जनता ही आपली अतिथी आहे. त्या भावनेतून सर्वांनी सहकार्याची भूमिका घ्यावी. २० मार्च हा शुक्रवार असल्याने महाडमधील अनेक हॉटेल्स व दुकाने बंद असतात. मात्र या दिवशी ती सुरू ठेवावीत, असे आवाहन व्यापारी व हॉटेल चालकांना करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे दक्षिण मध्य मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, महाड तालुका अध्यक्ष मोहन खांबे, कोकण अध्यक्ष प्रकाश मोरे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक बिपीन साळवे, पत्रकार मनोज खांबे, बौद्धजन पंचायत समितीचे माजी अध्यक्ष अशोक जाधव, दलितमित्र केशव हाटे, जिल्हा परिषद सदस्य मन्सूर ताज आदींसह स्थानिक आंबेडकरी नेत्यांनीही विविध सूचना मांडल्या.

## महाड एमआयडीसीमध्ये विजेच्या धक्क्याने कामगाराचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहती मधील या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का लागल्याने जागीच मृत्यू झाला. कामगारांच्या असुरक्षिततेबाबत सातत्याने चर्चेत असलेल्या महाड औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमध्ये असे अपघात वारंवार होत असल्याने कामगारांच्या जीविकास सातत्याने धोका निर्माण होत आहे. याबाबत प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी अशी कामगारांची मागणी होत आहे.

महाड औद्योगिक वसाहती मधील पिडीलाईट लिमिटेड या कारखान्यामध्ये काम करणारा असलम हरुण खान वय २५ राहणार बिरवाडी मूळ राहणार बिहार तरुण काम करीत असताना विजेचा धक्का लागल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता या ठिकाणी त्याला मृत घोषित केले

## कौलारू घरांचा उकाड्यापासून आधार

**तळा : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात गेल्या सात आठ वर्षांपासून घरांवरील कौले काढून त्याजागी पत्र्याचे छत टाकण्याचे प्रमाण अधिक वाढताना पहावयास मिळत आहे.कौलारू घरे ही उन्हाळ्यात व पावसाळ्यात आरोग्य दृष्टीने योग्य असतात.कोकण किनारपट्टीच्या भागात कौलारू घरेही भौगोलिक दृष्टीने योग्य आहेत.मात्र आता पत्र्याच्या घरांचे जणू काही फ्याड सुरू झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

सद्यस्थितीत गावागावात पन्नास टक्क्यांपर्यंत पत्र्याचे छत असलेली घरे दिसत आहेत.वाढत्या उष्णता मानात ह्या पत्र्यांच्या घरात अधिक उष्णता जाणवून उष्णतेचा त्रास होतो.मात्र उष्णतामान अधिक असले तरी कौलारू घरात उष्णता जाणवत नाही. पत्र्याच्या घरांपेक्षा कौलारू घरात अधिक शितलता राहते. व आरोग्यदायी वातावरण राहत असते. कौलारू घरे ही पावसाळ्यात ही सुरक्षित असतात.उतरत्या छपराची ही घरे असल्याने पावसाच्या पाण्यापासून ही चांगले संरक्षण मिळत असते.

तापमान व वातावरण बदलांमुळे कौलारू घरे ही संरक्षण व आरोग्याच्या दृष्टीने चांगली असल्याची ग्रामीण भागातील वयोवृध्द म्हणत आहेत. सद्यस्थितीत आधुनिकतेत कौलारू घरांची जागा ही पत्र्यांच्या व स्लॅपच्या घरांनी घेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



## चिन्मय नगर आदिवासीवाडी प्रकाशाने उजळली



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील चिन्मय नगर, प्रभाग क्र. १४ मधील आदिवासी वाडी अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांच्या अभावाशी झुंज देत होती. विशेषतः रस्ते व वस्तीमध्ये लाईटची सोय नसल्यामुळे संपूर्ण परिसर अंधारात बुडालेला होता. परिणामी येथील नागरिक, महिला व लहान मुलांना दररोज विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते.

अलीकडेच अध्यक्ष कुलदीप शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, परिवहन सभापती किशोर पाटील आणि नगरसेविका सौ. अश्विनीताई अत्रे यांनी या आदिवासी वाडीला भेट देऊन नागरिकांच्या समस्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. स्थानिक नागरिकांनी लाईटच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी मांडताच संबंधित लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेतली.

अश्वपरीस फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. इशिका शेलार यांनी जातीचे दाखले काढण्याच्या कामानिमित्त वाडीत ये-जा करत असताना या समस्येची तीव्रता अनुभवली होती. त्यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करत खोपोली नगरपालिकेकडे निवेदन सादर केले होते.

लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थेच्या संयुक्त प्रयत्नांमुळे प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधून तातडीने उपाययोजना करण्यात आल्या आणि वाडीत लाईट बसवण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

आज या आदिवासी वाडीत प्रकाश पसरला असून संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. अनेक वर्षांचा अंधार दूर झाल्याने नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून आनंदाचे वातावरण आहे.

विशेषतः आदिवासी बांधव, महिला भगिनी व लहान मुलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य झळकत आहे.या सकारात्मक बदलाबद्दल स्थानिक नागरिकांनी सर्व संबंधित लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-महोदर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः महोदर, तालुका- पनवेल, जिल्हा -रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| महोदर | १) दत्तात्रेय गोविंद पाटील.<br>२) शंकर गोविंद पाटील<br>३) केशव विठ्ठल पाटील<br>४) कृष्णा गोविंद पाटील<br>५) कांता गोविंद पाटील<br>६) बळीराम गोविंद पाटील<br>७) मारूती गोविंद पाटील<br>८) जनाबाई गोविंद पाटील<br>९) द्रोपदी हनुमान पाटील<br>१०) शशी कृष्णा पाटील<br>११) शांताराम धर्मा म्हात्रे<br>१२) बाळाराम धर्मा म्हात्रे<br>**रा. वांवजे, ता. पनवेल, जि. रायगड** | १३२ | ०.१३.५०<br>०.०३.५०<br>०.१७.००<br>हे. आर. पॉ. | २.६५ |
| | | | **एकुण** | **०.१७.००** |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
**पत्ता- प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं. ४**
**नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर**
**ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**


# गॅस वितरणासंदर्भात पेण नगर परिषद सभागृहात आढावा बैठक





**पेण : प्रतिनिधी**

इराण आणि अमेरिका-इस्रायल युद्धाची झळ आता भारताला देखील बसत असल्याने या युद्धामुळे विविध प्रकारच्या तेलाची समस्या भारतामध्ये जाणवू लागली आहे. देशात दैनंदीन जीवनाला आवश्यक असणारा घरगुती गॅस सिलेंडर आता मिळणार नाही अशी अफवा पसरली आहे. वाढत्या गॅस कमतरतेमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. गॅस मिळवण्यासाठी नागरिकांच्या मोठमोठ्या रांगा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर पेण नगरपरिषद कार्यालय येथे आमदार रवीशेठ पाटील यांच्या पुढाकाराने गॅस एजन्सी चालक, हॉटेल व्यवसायिक यांची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस पेण नगराध्यक्षा प्रितमताई पाटील, प्रांताधिकारी श्री.प्रवीण पवार, तहसीलदार श्री.तानाजी शेजाळ, पाटील, पेण मुख्याधिकारी जीवन पाटील तसेच शहरातील सर्व नगरसेवक आणि नागरिक देखील उपस्थित होते. शहर आणि तालुक्याला पुरेल एवढा गॅस सिलेंडरचा साठा उपलब्ध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

बैठकीदरम्यान आमदार रवीशेठ पाटील यांनी गॅस एजन्सी चालकांना स्पष्ट सूचना देत सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत गॅसचा तुटवडा होऊ देऊ नये, त्याचवेळी घरगुती गॅसचा मोठ्या प्रमाणात पुरवठा आहे तरी नागरिकांनी घाबरू नये असे गॅस एजन्सी मार्फत सांगण्यात आले. तातडीने गावोगावी आणि शहरातील प्रत्येक प्रभागात हे गॅस सिलेंडर कशा प्रकारे पोहोचतील याची व्यवस्था करा अशा सूचना देऊन गॅस एजन्सीच्या मालकांनी तातडीने ही व्यवस्था पूर्ववत करावी, तसेच नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नसून शहरात आणि ग्रामीण भागात गॅसचा पुरवठा सुरळीतपणे करण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले आणि सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे अशा सूचना यावेळी रविशेठ पाटील यांनी दिल्या.

पेण शहरासह तालुक्यातील गॅस सिलेंडर ग्राहकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता गॅस एजन्सी जवळ विनाकारण भर उन्हात रांगा लावू नका. पेणमध्ये मुबलक सिलेंडर पुरवठा असून आपल्याला बरोबर पंचवीस दिवसांनी बुकिंग केल्यावर सिलेंडर घरपोच नेहमी प्रमाणे मिळेल. प्रत्येक ग्राहकाला सुरळीत गॅस सिलेंडर सेवा देण्यासाठी भारत सरकार कटिबद्ध आहे आणि त्याप्रकारे सुरळीत व्यवहार सुरू आहे. ते यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले.


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८७/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | ऐतिहासिक चवदार तळे, महाड येथे ओझोनायझेशन आधारित जलशुद्धीकरण प्रणाली पुरविणे व बसविणे आणि सभोवतालच्या परिसराचा विकास व सुशोभीकरण करणे. | ₹ ४२,५३,६४,७५१.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २३/०३/२०२६ ते दिनांक १६/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ३०/०३/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०७/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-महोदर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः महोदर, तालुका- पनवेल, जिल्हा -रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| महोदर | १ जगदिश हरिभाऊ पाटील<br>रा. ओवळे,ता.पनवेल जि. रायगड | १९८/३/२ | ०.५०.००<br>०.००.००<br>०.५०.००<br>हे. आर. पॉ. | ११.५३ |
| | | **एकुण** | **०.५०.००** | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
**पत्ता- प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं. ४**
**नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर**
**ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.**



### कागदपत्रे हरविलेबाबत

मी,श्री. मिर्झाहाजी दादा बेग, पत्ता : आटोला लातुर, महाराष्ट -४१३५२४ माझेकडून दिनांक १४/०३/२०२६ रोजी पाताळगंगा ते मोहोपाडा येथे प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी ॲफिडेवीट केले आहे. ॲफिडेवीट नं. २५५२०४१७५१२६८६००१९०३०० यांची नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. दहावीचा शाळेचा मुळ दाखला व त्याबरोबर इतर झेरॉक्स

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९५५२९३७६९० या क्रमांकावर संपर्क साधावा.

**दिनांक :- १७/०३/२०२६**

**सही/-**
**मिर्झाहाजी दादा बेग**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे लोणिवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे लोणिवली, तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १०१/४ | १ | ०-२९-५० | ०-००-२० | ०-२९-७० | ५.४४ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९

# उष्णता वाढतेय! नागरिकांनो आरोग्य जपा!!

## नवी मुंबई महापालिकेकडून दक्षता घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

मार्च महिन्यापासून राज्यातील अनेक भागात तापमान वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. साधारणपणे एखादया प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ डिग्री सेल्सियसने जास्त असेल किंवा सलग दोन दिवसांसाठी ४५ डिग्री सेल्सियसपेक्षा जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात. यामध्ये माणसांसोबतच पक्षी, प्राणी, वनस्पती यांनाही हानी होण्याची शक्यता असते. साधारणपणे मार्च ते मे या मान्सून पूर्वकाळात उष्णतेच्या लाटा येताना दिसतात.

उष्णतेच्या किंवा अति उष्णतेच्या लाटेमुळे चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ व उलटी होणे, अधिक घाम येणे, थकवा जाणवणे ही लक्षणे दिसून येतात. या कालावधीत हवामान बदल होतात व या बदलांमध्येही आरोग्य उत्तम व निरोगी रहाण्यासाठी खालील बाबींचे पालन करा.



**काय करावे**

तहान लागली नसली तरीही जेव्हा शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्यावे (किमान अडीच ते तीन लिटर पाणी प्या.) प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन (ORS) वापरावे आणि लिंबू पाणी, ताक /लस्सी आणि फळांचे रस यांसारखे घरगुती पेये प्यावी. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर तसेच स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारखी जास्त पाणी सामग्री असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात. पातळ, सैल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे कपडे घालावेत. थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असताना तुमचे डोके झाकून ठेवावे त्यासाठी छत्री, टोपी, टॉवेल आणि इतर पारंपारिक साधनांचा वापर करावा.

उन्हात बाहेर जाताना शूज किंवा चप्पल घालावी. हवेशीर आणि थंड ठिकाणी जास्त वेळ घालवावा. थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटा रोखाव्यात, त्यासाठी दिवसा खिडक्या आणि दारे बंद ठेवावीत, स्वयंपाक करताना पुरेशा प्रमाणात हवा येण्यासाठी दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवा. घराबाहेरील कामांचे नियोजन शक्य असल्यास दिवसाच्या सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेत करा.

**काय करू नये**

उन्हात विशेषत: दुपारी १२:०० ते ० ३:०० या वेळेत बाहेर पडणे टाळावे. दुपारच्या वेळी उन्हामध्ये असताना कठोर परिश्रम टाळावे. अनवाणी बाहेर जाणे टाळावे. अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड सॉफ्ट ड्रिंक्स किंवा मोठ्या प्रमाणात साखर असलेले पेय पिणे टाळावे. उच्च प्रथिनेयुक्त अन्न, आणि शिळे अन्न खाणे टाळावे. उभ्या केलेल्या वाहनांमध्ये लहान मुले किंवा पाळीव प्राणी यांना एकटे सोडणे टाळावे.

लहान अर्भके, लहान मुले, घराबाहेर काम करणारे लोक, गर्भवती, मानसिक आजारपण असलेल्या व्यक्ती, शारीरिकदृष्ट्या आजारी, विशेषतः हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब या व्यक्ती अति संवेदनशील आहेत. या लोकांना उष्णतेचा धोका इतरांपेक्षा जास्त असतो आणि त्यांच्याकडे अतिरिक्त लक्ष द्यावे.

वातावरणातील उष्णता ही नेसर्गिक चक्र आहे यामुळे त्याला सामोरे जाताना काय करावे व काय करू नये या सूचनांचे पालन केल्यास नवी मुंबईतील सर्व नागरिकांचे आरोग्य उष्माघातापासून सुरक्षित राहील आणि उष्माघात संदर्भात लक्षणे आढळून आल्यास त्वरित नमुंमपाच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयातून उपचार घ्यावेत, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

दरम्यान, निसर्गनियमानुसार वातावरणात बदल होणे हे स्वाभाविक असते. उन्हाळ्यात उष्णता वाढल्याने आरोग्यविषयक अनेक समस्या डोकं वर काढत असतात. शिवाय ऋतुमानानुसार आहारशैलीत बदल केल्यास आरोग्य उत्तम ठेवण्यास तेवढीच मदत होते. यंदा मार्चमध्येच मे महिन्यातील उष्णता जाणवायला लागली आहे. उष्णता वाढली की, अनेक आजारदेखील अचानक डोकेवर काढतात. अशावेळी तब्येतीची काळजी घेणे खूपच गरजेचे असते.

# नवनिर्वाचित नगरसेवकांचा ब्रह्माकुमारीजकडून सत्कार

**उरण : बातमीदार**

समाज सेवा विभाग तसेच ब्रह्माकुमारीज (मुख्यालय: माउंट आबू) यांच्या पनवेल शाखेतर्फे पनवेल महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या सन्मानार्थ भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्यासह अनेक नगरसेवक उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात मंचावर महापौर नितीन पाटील यांचा पारंपरिक पद्धतीने फेटा, तिलक, ब्रोच तसेच ओम शांती असे लिहिलेल्या स्वागतपट्ट्याने सन्मान करून करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीके वंदना दीदीजी यांनी केले.

मालिया हिने सुंदर स्वागत नृत्य सादर केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.पनवेल येथील ब्रह्माकुमारी सेवा केंद्राच्या मुख्य संचालिका बीके तारा दीदीजी यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करताना सांगितले की, जनप्रतिनिधींनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून या आध्यात्मिक कार्यक्रमाला उपस्थिती लावली, याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

मुख्य वक्त्या म्हणून महाराष्ट्र व आंध्रप्रदेश झोनच्या मुख्य प्रभारी तसेच माउंट आबू येथील ब्रह्माकुमारी मुख्यालयाच्या अतिरिक्त मुख्य प्रशासिका वरिष्ठ राजयोगिनी संतोष दीदीजी यांनी आपल्या आशीर्वचनात सांगितले की, भारतभूमीची महिमा अत्यंत महान आहे. त्या म्हणाल्या की आपण त्या देशाचे नागरिक आहोत जिथे कधीकाळी देवतांचे राज्य होते आणि जिथे सिंह व बकरी एकाच घाटावर पाणी पीत होते. भारत कधी काळी स्वर्गासमान होता, परंतु काळचक्रानुसार द्वापर आणि कलियुगात अज्ञानाचा अंधकार पसरला.

कार्यक्रमात महापौर नितीन पाटील यांनी सांगितले की, ब्रह्माकुमारी संस्थेकडून समाजात आध्यात्मिक जागृतीसाठी केले जाणारे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. आपल्या देशाचे प्राचीन वैभव पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी अशा आध्यात्मिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच समाजात व्यसनमुक्ती आणि सकारात्मक बदल घडवण्यासाठी सर्वांनी मिळून काम करण्याचे आवाहन केले.

नगरसेविका दर्शना भोईर यांनी सांगितले की, समाजसेवेसाठी आध्यात्मिक प्रेरणा अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या कार्यांचे कौतुक करत सांगितले की अशा संस्था समाजात सकारात्मक ऊर्जा आणि संस्कार निर्माण करतात. शहराचा विकास, स्वच्छता आणि जनकल्याणासाठी सर्व नगरसेवकांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात यशवंत पाटील यांनी नृत्य प्रस्तुतीही सादर केली. यानंतर उपस्थित मान्यवरांना राजयोग ध्यान (गाईडेड मेडिटेशन) चा अनुभव देण्यात आला.

# आमदार मंदा म्हात्रेंना हृदयविकाराचा झटका

## शस्त्रक्रियेनंतर प्रकृती स्थिर

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**



बेलापूर मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांना मंगळवारी पहाटे हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली. रात्री साधारण अडीचच्या सुमारास अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने नवी मुंबईतील अपोलो रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्वरित तपासणी करून त्यांच्यावर रात्रीच शस्त्रक्रिया केली. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, त्यांना वैद्यकीय देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती त्यांचे सुपुत्र निलेश म्हात्रे यांनी दिली आहे.

निलेश म्हात्रे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शस्त्रक्रियेदरम्यान आमदार मंदा म्हात्रे यांच्या शरीरात दोन स्टेंट बसविण्यात आल्या आहेत. शस्त्रक्रियेनंतर आमदार म्हात्रे यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांना वैद्यकीय देखरेखीखाली ठेवण्यात आले आहे. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याची माहिती त्यांचे सुपुत्र निलेश म्हात्रे यांनी दिली. अचानक आलेल्या या घटनेमुळे नवी मुंबईतील राजकीय व सामाजिक वर्तुळात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढील काही दिवस त्यांना विश्रांती घ्यावी लागणार असून, त्यांच्या आरोग्यावर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# 'बीआरएसएफ'तर्फे कांशीराम यांची जयंती साजरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बामसेफचे संस्थापक कांशीराम यांची ९२वी जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन सानपाडा, सेक्टर १० येथे बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. नवीन प्रतापे यांच्या पुढाकाराने रविवार, १५ मार्च रोजी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश माने तर प्रमुख वक्ते म्हणून ओबीसी महासंघाचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रदीप ढोबळे, अ‍ॅड. दिनेश राजभर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात बहुजन साहित्य कला अकादमीचे गायक निलेश गायकवाड यांच्या प्रेरणा गीतांनी झाली. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश माने यांनी, बहुजन चळवळीतील नेते कांशीराम यांनी बहुजन समाजाला केवळ राजकीय दिशा दिली नाही, तर सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहचण्याची राजकीय शक्ती दिली. आज बहुजन समाजाला कांशीराम त्यांच्या विचारांवर चालत संघटित राजकीय शक्ती उभी करण्याची आवश्यकता आहे.



प्रमुख वक्ते अ‍ॅड. प्रदीप ढोबळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, देशातील ओबीसी, दलित, आदिवासी आणि इतर मागास समाज एकत्र आला तरच सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. कांशीराम यांनी बहुजन एकतेची राजकीय संकल्पना दिली, ती आज अधिक ताकदीने राबवण्याची गरज आहे. यावेळी अ‍ॅड. दिनेश राजभर, डॉ. पंकज चाळके यांनीदेखील आपल्या भाषणात कांशीराम यांच्या संघर्षमय चळवळीचा मागोवा घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अ‍ॅड.नवीन प्रतापे, सुरेश केदारे, अ‍ॅड. चैतन्य कांबळे, एस. आर. सिंग तसेच बीआरएसपी पक्षाच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीपी वर्ल्ड न्हावा शेवा कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण : बातमीदार**

डीपी वर्ल्ड न्हावा शेवा कंपनीमध्ये रुजू झालेल्या कामगारांना २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल रौप्य महोत्सव त्यांच्या कुटुंबा समवेत मोठ्या उत्साहात रामकृष्ण आत्माराम पाटील सभागृह (सोमवंशीय क्षत्रिय पाठारे सभागृह) चिंबळथळी, म्हातवलि उरण येथे साजरा करण्यात आला.

या सोहळ्या करिता कंपनीचे सीईओ जीबु कुरियन ईटटि स्वतः हजर राहून कामगारांच्या आनंदात सहभागी झाले व आपला मौलिक वेळ त्यांनी कामगारांना देवून त्यांनी कामगारांना मार्गदर्शन केले व सर्व कामगारांचे कामगारांनी स्नेहसंमेलनाबद्दल अभिनंदन केले. तसेच सर्वांचे कौतुक ही केले. कामगारांनी एकत्रित येवून आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनात छोट्या शाळकरी मुलांचे डान्स परफॉर्मन्सदेखील आयोजित केले होते. महिलांसाठी विविध प्रकारचे खेळ व मनोरंजनात्मक कार्यक्रमदेखील आयोजित केले होते.





**नवी मुंबई : यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई यांच्यातर्फे काशिनाथ जाधव यांना त्यांच्या प्रशासकीय, सामाजिक, साहित्यिक कार्याबद्दल २०२६चा कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

# उरणच्या चिर्ले सुपारीबाग येथे पोपटी काव्य संमेलन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील शिव कादंबरीकार इतिहासाचार्य के.एम मढवी यांच्या चिर्ले येथील सुपारीबाग निवासस्थानी काव्य दरबार आयोजित २०२६ चे ११३ वे पोपटी काव्य संमेलन सोहळा, इतिहासाचार्य के.एम मढवी यांच्या सुपारीबाग निवासस्थानी झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कवी व गीतकार संदेश भोईर यांना देण्यात आले होते.व्यासपीठावर प्रमुख पाहुणे साहित्यिक चंद्रकांत पाटील, गीतकार रामनाथ म्हात्रे, म.वा म्हात्रे, पत्रकार उत्कर्ष समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष मिलिंद खारपाटील, अभिनेता वीरेंद्र रत्ने, साहित्यिक ए.डी. पाटील, साहित्यिक सुरेश भोपी, आदी उपस्थित होते.

काव्य दरबारचे संस्थापक नव इतिहासाचार्य काशिनाथ मढवी तसेच काव्यदरबारचे सदस्य मिनल माळी, हरिश्चंद्र माळी, भ.पो मात्रे, रेशमा ठाकूर, अरुण द म्हात्रे, ह्यांनी कवी संमेलनाचे आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवात गणेश पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. इशस्तवन अरुण म्हात्रे



यांनी सादर केले. तसेच खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे हे सुमधुर गाणी सादर केले. तदनंतर पोपटीसाठी अग्निपूजन करण्यात आले.

उपस्थित महिलांनी अग्नीला ओवाळणी केली. आणि सर्वांनी एकत्र लाने गो झांजुराचे हे होळीचे गाणे एकत्र सादर केले. सर्व उपस्थित मान्यवर, कवी, साहित्यिक, चित्रकार यांचे स्वागत करण्यात आले. के एम मढवी सरांनी प्रास्ताविक सादर केले. काव्यदरबार तर्फे अनेक गुणवंतांना पुरस्कृत केले

पुरस्कार वितरण समारंभा नंतर पेण– अलिबाग आगरी साहित्यिक सांस्कृतिक सामाजिक संस्थेतर्फे आगरातील तेजस्विनी म्हणून मनस्वी मिनल शंकर माळी हिला सन्मानपत्र देण्यात आले. कार्यक्रमांतर्गतच सर्वांनी पोपटीचा आस्वाद घेऊन आगरी मेनू असलेले भोजन ग्रहण केले. सूत्रसंचालन आगरी साहित्यिका मिनल माळी, रेशमा ठाकूर, अरुण द म्हात्रे यांनी केले.

# पनवेल पत्रकार मंचाचा शिर्डी–शिंगणापूर अभ्यास दौरा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था म्हणून सुपरिचित असणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाची नवनिर्वाचित वार्षिक कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली आहे. मंचाच्या परंपरेनुसार नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी शिंगणापूर अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. १३ व १४ मार्च रोजी झालेल्या दौऱ्यामध्ये सदस्यांना कीटचे आणि ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले.



विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे माध्यमातून वंचित, दुर्लक्षित घटकांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी पनवेल तालुका पत्रकार विकास मंच सातत्याने कार्यान्वित राहिलेला आहे. मंचातील सर्व सदस्यांना पदाधिकारी म्हणून कार्य करता यावे याकरता पनवेल तालुका पत्रकार विकास मंचामध्ये नामनिर्देशनाद्वारे एकमताने वार्षिक कार्यकारणी निवड केली जाते. नवनिर्वाचित पदाधिकारी व सर्व सदस्य वर्षाची सुरुवात शिर्डी शिंगणापूर येथे श्री साईबाबा तसेच श्री शनेश्वर महाराज यांच्या चरणी नतमस्तक होऊन करत असतात.

यंदाच्या अभ्यास दौर्यात राहुरी येथे प्राजक्त तनपुरे यांच्या संभाव्य भाजप प्रवेशामुळे उद्भवलेला राजकीय पेच प्रसंग, द्राक्षाची नवीन संकरित जात, बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव कुत्र्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी अनोख्या पद्धतीने बनवलेला मानेचा पट्टा अशा विषयांवर सखोल अध्ययन करण्यात आले. विशेष लक्षणीय म्हणजे कोपरगाव येथील प्रवीण पाटील व प्रसाद पाटील संचलित काव्या येवले पैठणी या भव्य शोरूमच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल तालुका पत्रकार विकास मंचातील पदाधिकारी सल्लागार व सदस्यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी काव्या येवले पैठणी येथे मंचातील सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत केक कापून वर्धापन दिन सोहळा साजरा करण्यात आला.

शिर्डी येथील भव्य ऑडिटोरियम मध्ये अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी तमाम सदस्यांना ओळखपत्रे, गाडीवर लावायचे स्टिकर्स आणि वार्षिक किटचे वाटप केले. यावेळी अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, सरचिटणीस हरेश साठे, उपाध्यक्ष दीपक घोसाळकर, खजिनदार दत्ता कुलकर्णी, उपसचिव राजू गाडे,सदस्य लालचंद यादव यांची उपस्थिती होती. पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे अभ्यास दौर्यात सहभागी होता येत नसले तरीदेखील अभ्यास दौर्यावर जाणाऱ्या सदस्यांना सी ऑफ करण्यासाठी प्रवीण मोहोकर व भरत कुमार कांबळे हे आवर्जून हजर होते.

# सागर सांगडे यांना मान्यवरांकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड किसान मोर्चाच्या अध्यक्षपदी सागर सांगडे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सागर सांगडे यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सागर सांगडे यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करत किसान मोर्चा अधिक बळकट करण्याचे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी किसान मोर्चाचे तालुका अध्यक्ष साजन पवार, सोपान काठे, बाळू काठे, कैलास माढवी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.





दरम्यान, सागर सांगडे यांनी भाजपचे उत्तर रायगड रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांची मंगळवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी सागर सांगडे यांचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी किसान मोर्च्याचे तालुका अध्यक्ष साजन पवार, सोपान काठे, बाळू काठे, कैलास मढवी आदी उपस्थित होते.

# चौल-आग्राव रस्त्याचे काम संथ गतीने

## विद्यार्थी, ग्रामस्थ, प्रवासीवर्गाचे बेहाल; नाराजी व्यक्त

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल-आग्राव रस्ता नुतनीकरणास प्रारंभ झाला, काही ठिकाणी क्रॉकिटीकरण सुध्दा झाले, मात्र या कामासाठी अनेक ठिकाणी रस्ता खोदाई सुध्दा करण्यात आली आहे. हे काम अत्यंत संथ गतीने होत असून चौल-आग्राव पंचक्रोशीतील विद्यार्थी, ग्रामस्थ व प्रवासीवर्ग यांचे बेहाल होत आहे. एकूणच दोन वर्षापुर्वी मंजूर निधीचे काम ठेकेदार वेळेत काम पुर्ण न केल्याने नागरिकांच्या संप्तत प्रतिक्रिया समोर येत आहेत.



चौल-आग्राव रस्ताला निधी मंजूर होवून दोन वर्ष उलटले, गेल्यावर्षी जानेवारीमध्ये काम सुरू करण्याची ठेकेदाराला निविदा प्राप्त झाली होती, परंतू तेव्हाही काम सुरू करण्यात आले नाही, पर्यायी रस्ता नसल्याने ऐन पावसाळ्यातसुध्दा काम पुर्ण करता आले नाही, दिवाळीपुर्वी सुरू झालेले चौल-आग्राव नुतन क्रॉंकिटीकरणाचा रस्ता सहा महिने उलटून गेले तरी अद्यापही पुर्तता केली जात नाही. संबधीत ठेकेदार या कामात दिरंगाई करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

चौल-आग्राव रस्ता नुतनीकरणाने आग्राव-अलिबाग एसटी बसेस बंद असल्याने विद्यार्थीवर्गाचे खुप हाल होत आहेत, तसेच ग्रामस्थ व प्रवासीवर्ग यांचेही बेहाल झाले आहे. रस्ताचे कामाची पुर्तता न झाल्याने ठिकठिकाणी ठेकेदारानी मटेरीयल रस्तात टाकले असल्याचे तेथे दोन चाकी, तिन चाकी वाहनाच्या अपघातास निमत्रंण ठरत आहे.

एकूणच ठेकेदाराच्या मनमानीने चौल-आग्राव रस्ता नुतनीकरण संथ गतीने होत असून संबधीत खात्याने लक्ष्य देवून ठेकेदारास कामाच्या पुर्ततेचा कालावधी जाहीर करावा; अन्यथा सदर ठेकेदारास काळया यादीत टाकून हे काम काढून घेण्यात यावे, अशी मागणी पंचक्रोशीतून सर्व थरातून केली जात आहे.

# टूथ माउंटेन रिसॉर्टवर धाड

## सात सिलिंडर जप्त; पुरवठा शाखेची कारवाई

**चौक : प्रतिनिधी**

चौक कर्जत रस्त्यावरील टूथ माउंटेन रिसॉर्ट येथे घरगुती वापराचे सात सिलेंडर पकडण्यात आले असून त्यावर जप्तीची कारवाई खालापूर महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप यांनी केली आहे. यावेळी पुरवठा अधिकारी मनोज पवार उपस्थित होते.

सद्द्या खाद्य पदार्थ बनविण्यासाठी गॅस सिलिंडर तुटवडा जाणवत असून त्याचा परिणाम छोट्या मोठ्या हॉटेल व्यावसायिक यांना होताना दिसत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्या मध्ये गेले काही दिवसांपासून भयंकर युद्ध सुरूच आहे. आखाती देशांमध्ये युद्धाची आग धुमसत असल्याने येथून भारताला होणारा खनिज तेलाचा (Crude Oil) आणि नैसर्गिक वायूचा (CNG) पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे



आता महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती गॅस, नैसर्गिक वायू आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला असून जनता आता गॅसवर आहे.

याचा जास्त फटका खाद्य पदार्थ बनवणारे छोटे व्यावसायिक यांना बसताना दिसत असून ग्रामीण भागातील चहा, वडापाव विकणारे यांनी व्यवसाय बंद ठेवला आहे. यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त होणार आहे. यातच मोठ्या हॉटेल धारकांनी गॅस सिलेंडर याचा साठा करून ठेवल्याची माहिती समोर येत असून आज कर्जत चौक रस्त्यावरील टूथ माउंटेन रिसॉर्ट याच्यावर मंडळ अधिकारी माणिक सानप, पुरवठा अधिकारी मनोज पवार व अन्य पुरवठा आणि महसूल कर्मचारी यांनी धाड टाकल्यावर तिथे दोन भरलेले व पाच रिकामे सिलेंडर जप्त करण्यात आले असून हे सिलेंडर घरगुती वापरासाठी आहेत. तीन भारत पेट्रोलियम व चार हिंदुस्थान पेट्रोलियम यांचे आहेत.

चौक चे प्रभारी पोलीस उप निरीक्षक विशाल पवार हे पुढील कारवाई करीत असून उशिरा पंचनामा सुरू आहे, हे घरगुती सिलेंडर त्याच्याकडे कसे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आणखी युद्ध सुरू राहिल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर स्वरुप धारण करू शकते.

# साजगाव शाळेत तालुकास्तरीय गणित, इंग्रजी गुणवत्ता विकास स्पर्धा

**चौक : प्रतिनिधी**

पंचायत समिती खालापूरच्या वतीने इयत्ता पहिली ते आठवीच्या गुणवत्ता विकास स्पर्धा झाल्या. याची प्रत्यक्ष पाहणी खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे व उपसभापती भाई शिंदे यांनी केली.

गुणवत्ता विकास स्पर्धेसाठी नवनिर्वाचित रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या रेश्मा राजेश पाटील, पंचायत समिती सदस्य देवयानी अजित देशमुख, गट शिक्षण अधिकारी दीपा परब, वरिष्ठ विस्ताराधिकारी शिल्पा दास आदींसह सर्व केंद्रप्रमुख, स्पर्धक विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. विजेत्या सर्व विद्यार्थ्यांना शिपला फाउंडेशनच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

सर्वात जास्त पारितोषिक मिळवणाऱ्या जिल्हा परिषद शाळा साजगाव शाळेला जनरल चॅम्पियनशीप देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सुरेश चव्हाण, पांडुरंग काळे आदींसह आत्करगाव केंद्रातील सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन राम बिरादार यांनी केले.



# माहिती अधिकार महासंघाच्या उपोषणकर्त्यांशी सभापती कृष्णा पारंगे यांनी केली चर्चा

**चौक : प्रतिनिधी**

कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने करण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ खालापूर यांच्या उपोषणाला खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी भेट देऊन कार्यकर्त्यांशी चर्चा केली. उपोषणाचा आजचा २२वा दिवस आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते, माहिती अधिकार महासंघाचे पदाधिकारी यांनी खालापूर पंचायत समिती कार्यालयासमोर सुरू केलेल्या उपोषणाचा आजचा २२ वा दिवस आहे. पंचायत समिती प्रशासनाने लेखी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न केल्याने आमची फसवणूक झाली आहे, असे कार्यकर्ते सुरेश गावडे



यांनी सांगितले.

मागण्या पुऱ्या होईपर्यंत साखळी उपोषणास बसून राहू. ग्रामसेवकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करा. सर्व ग्रामपंचायत कार्यालयात: अ) कामाच्या वेळेचा (स. ९.४५ ते सायं. ६.१५) फलक लावावा. ग्रामसेवकांचे नाव आणि मोबाईल नंबर असलेला फलक लावा. हालचाल रजिस्टर मेंटेन करून ग्रामसेवकांना त्यात नोंद करणे सक्तीचे करा.माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ख) मधील १ ते १७ बाबींचा फलक कार्यालयात दर्शनी भागात

लावणे बंधनकारक करा. हा १७ वर्षांपूर्वी झालेला कायदा आहे. आम्हांला आज १७ वर्षानंतर ही अंमलबजावणी करण्यासाठी संघर्ष करावा लागतो आहे. असेही सांगण्यात आले. आपल्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी आपण प्रत्यक्ष लक्ष घालू, असे सभापती कृष्णा पारंगे यांनी सांगितले.

# निळज येथे वाकडाई माता मंदिराचा प्रथम वर्धापन दिन

**माणगाव : बातमीदार**

माणगांव तालुक्यातील निळज येथे श्री वाकडाई माता मंदिराचा प्रथम वर्धापन दिन सोमवार, १६ मार्च रोजी मोठ्या आनंदात आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. देवीचा अभिषेक सोहळा आणि श्रीसत्यनारायणाची महापूजा अत्यंत धार्मिक व भक्तिमय वातावरणात पार पडली. त्यानंतर महाआरती व तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी निळज, धरणाची वाडी, बौद्धवाडी, आदिवासीवाडी तसेच परिसरातील ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्धापन दिन सोहळ्यामुळे संपूर्ण गावात दिवसभर उत्साह आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले.



# काटरंग येथे महिला दिन उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

महिला दिनाचे निमित्त साधत १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ७:३० वाजता महालक्ष्मी मंदिर काटरंगच्या मैदानात १८ वर्षांवरील सर्व महिलांसाठी स्पोर्ट्स फिएस्टा (खेळ उत्सव) आयोजित करण्यात आला होता.

स्पोर्ट्स फिएस्टाचे उद्घाटन महालक्ष्मी मंदिर काटरंगच्या प्रमुख व्यवस्थापक करुणा येरूणकर यांच्या हस्ते करण्यात आले व त्यांना शाल आणि फूल देऊन क्लबच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

स्पोर्ट्स इन्चार्ज व्हाईस प्रेसिडेंट राजश्री आणि पास्ट प्रेसिडेंट सरिका यांन खूप वेगळे वेगळे खेळ आयोजित केले होते, ज्याचा उपस्थित सर्व महिलांनी आनंद घेतला. क्लबच्या उपस्थित सर्व सदस्यांनी या प्रोजेक्ट मध्ये भाग घेउन भरपूर सहकार्य केले.



या स्पोर्ट्स फिएस्टामध्ये खोपोलीतील ४० ते ४५ महिलांनी सहभाग घेतला. बक्षीस म्हणून सर्व विजेत्यांना क्लबच्या वतीने गोल्ड आणि सिल्वर मेडल तसेच चॉकलेट आणि रुमाल देण्यात आले. मधे मधे सरप्राइज गेम आणि प्रश्न उत्तर घेतले गेले, व त्यांनाही बक्षीस देण्यात आली.

जागतिक महिला दिनानिमित्त इनरव्हील क्लब तर्फे एका कर्तुत्ववान महिलेचा सत्कार केला जातो तो ह्या वर्षी धनश्री गौडा (कोंडुस्कर), ज्या जनता ज्युनियर कॉलेजमध्ये स्पोर्ट्स टीचर आहेत त्यांना देण्यात आला. वंडरफुल स्पोर्ट्स महिला म्हणून त्यांना ट्रॉफी, शाल आणि फूल देऊन सन्मानित करण्यात आले.

ह्या कार्यक्रमासाठी इनरव्हील क्लबच्या ३० मेंबर्स उपस्थित होत्या, अध्यक्ष दीना शहा, सेक्रेटरी मधुमिता पाटील, उपाध्यक्ष राजश्री मुंदडा, खजिनदार दीपिका कोठारी, व इतर सदस्य उपस्थि होते, तसेच नागरी सामाजिक विकास संस्था अध्यक्ष वर्षा मोरे त्यांच्या पूर्ण टीम सोबत उपस्थित होत्या व इतरही अनेक महिलांनी ह्या कार्यक्रमात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# रोहा नगरपालिकेकडून महिलांसाठी व्यवसायाभिमुख प्रशिक्षण

**रोहा : प्रतिनिधी**

येणाऱ्या काळात महिलांकरता सांस्कृतिक कार्यक्रम व महिला उद्योजिकांच्या उत्पादनाचे प्रदर्शन व विक्री स्टॉलचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी रोहा अष्टमी नगर परिषदेस दिले आहेत.

महिलांसाठी रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने विविध व्यावसायिकाभिमुख अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ना. आदिती तटकरे डॉ. सी.डी.देशमुख सभागृह येथे बोलत होत्या. या सूचनांची अंमलबजावणी करण्याची आश्वासन नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिले आहे.



रोहा अष्टमी नगर परिषद मार्फत महिला व बालकल्याण समिती अंतर्गत नगराध्यक्ष वनश्री समीर शेडगे यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वाखाली जागतिक महिला दिन २०२६ च्या निमित्ताने महिलांकरता कापडावर आरीवर्क बनवणे, ज्युटच्या वस्तू बनवणे, साबण वॉशिंग पावडर हँडवॉश बनवणे इत्यादी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे शुभारंभ ६ मार्च रोजी रोहा अष्टमी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष वनश्री समीर शेडगे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व कर्तुत्वान महिलांचा स्मरण करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला होता. प्रशिक्षण कार्यक्रम १४ मार्च पर्यंत घेण्यात आले असून प्रशिक्षण संस्था मे माऊली फाउंडेशन (कांदिवली तालुका दापोली जिल्हा रत्नागिरीच्या) अध्यक्ष श्रीमती अर्चना माने यांनी प्रशिक्षणाचे योग्य नियोजन केले होते. रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील अंदाजे ४०० महिलांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. १५ मार्च रोजी. कार्यक्रमाच्या समारोपाच्या निमित्ताने महिलांकरिता डिजिटल मार्केटिंग बेसिक प्रशिक्षणाचे आयोजन करत उद्योजकते कडे वाटचाल करणाऱ्या महिलांच्या ज्ञानात भर घातली. प्रशिक्षणार्थीना महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व रोहा अष्टमी नगर परिषद नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या हस्ते महिलांना प्रमाणपत्र वाटप करून महिलांकरता व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

रोहा अष्टमी नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांचे व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती निता हजारे यांनी मार्गदर्शन केले. उपसभापती गौरी बारटक्के, सदस्या स्नेहा आंब्रे, प्रियंका धनवडे, फराह पानसरे, अफरीन रोगे, अलमास मुमेरे, संजना शिंदे, पूर्वा मोहिते सुप्रिया जाधव यांचे कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी सभापती नगरसेवक व महिला उपस्थित होत्या.

# रोहा येथे भाजपतर्फे महिला दिन साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त भारतीय जनता पक्ष रोहा महिला मोर्चाच्या वतीने तालुकास्तरीय महिला दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. महिलांच्या सशक्तीकरणासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित हा उपक्रम विशेष ठरला.

हा कार्यक्रम जिल्हा अध्यक्षा चित्रा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. जिल्हा सचिव श्रद्धा घाग, तालुका अध्यक्षा रिया कासार आणि शहराध्यक्षा मृणाल पेंडसे यांच्या पुढाकारातून कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून भाजपा जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे उपस्थित होत्या, तर प्रमुख वक्त्या



म्हणून ॲड. पल्लवी दाते यांनी महिलांना मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांच्या हक्क, कायदेशीर संरक्षण आणि स्वसंरक्षण याविषयी सविस्तर माहिती देत महिलांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले. यावेळी रोहा भाजपा तालुकाध्यक्ष अमित घाग, नगरसेवक रोशन चाफेकर, परेश चितळकर, वैभव कुलकर्णी, स्मिता घरत, सुनयना गोरे, सुरेखा कदम तसेच जयश्री भांड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये महिलांच्या सुरक्षेविषयी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते तसेच महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

याचबरोबर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रिद्धी बोथरे, श्रद्धा कुंटे पाटील, सायली भिंगे आणि डॉ. अनामिका लोहार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याची दखल घेत भाजप महिला मोर्चाने त्यांना प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून गौरविले.

महिलांच्या सशक्तीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थित महिलांनी अशा उपक्रमांमुळे आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सकारात्मक बदल घडतो, असे मत व्यक्त करत भाजपा महिला मोर्चाच्या कार्याचे कौतुक केले.

# शिक्षक राजेंद्र अंबिके, सायराबानू चौगुले यांची निवड

**पाली : प्रतिनिधी**

राज्यातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या उत्कृष्ट शिक्षकांची एक 'बँक' तयार करण्यासाठी SCERT महाराष्ट्र व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राबविण्यात आलेल्या 'आयडॉल शिक्षक' शोधप्रक्रियेत सुधागड तालुक्यातील राज्य आदर्श शिक्षक राजेंद्र अंबिके यांची निवड झाली आहे. रायगड जिल्ह्यातील प्रथम १० शिक्षकांमध्ये स्थान मिळवत त्यांनी तालुक्याच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला आहे.



राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील उत्तम काम करणाऱ्या, नवनवीन प्रयोग राबविणाऱ्या आणि तंत्रस्नेही शिक्षकांचा शोध घेण्यासाठी ही प्रक्रिया राबविण्यात आली होती. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे, शाळेचा कायापालट करणे आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा वापर करणे या निकषांच्या आधारे अंबिके यांची ही निवड करण्यात आली आहे.

या निवडीनंतर SCERT महाराष्ट्रने आयडॉल शिक्षकांसाठी विशेष उपक्रम जाहीर केले आहेत. यामध्ये मार्गदर्शक म्हणून भूमिका: निवड झालेल्या शिक्षकांना विविध प्रशिक्षणे, कार्यशाळा आणि चर्चासत्रांमध्ये 'तज्ज्ञ मार्गदर्शक' म्हणून पाचारण केले जाईल.

राजेंद्र अंबिके यांच्या या यशाबद्दल सुधागड तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे. त्यांच्या या निवडीमुळे ग्रामीण भागातील शिक्षकांना प्रोत्साहन मिळणार असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची चळवळ अधिक विस्तारण्यास मदत होणार आहे.

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या प्रसिद्ध कवी तथा लेखिका व उपक्रमशील शिक्षिका म्हणून ज्यांची संपूर्ण रायगड जिल्ह्यात ओळख आहे, अशा हरहुन्नरी शिक्षिका सायराबानू वजीर चौगुले यांची शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यामार्फत गुणवत्ता प्राप्त आयडॉल शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे संचालक डॉ.हेमंत वसेकर यांनी चौगुले यांना पत्र पाठवून कळविले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

आयडॉल शिक्षक व शैक्षणिक संस्था,शाळा बँक तयार करणेबाबत १६ एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णय घेण्यात आला. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे कार्य करणाऱ्या उत्तम



दर्जाच्या शिक्षकांची बँक तयार करण्यासाठी राज्यामध्ये आयडॉल शिक्षक शोध प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामध्ये जिल्हास्तरावरून सर्व तालुकास्तरीय याद्यांची पडताळणी करून राज्यस्तरासाठी जिल्ह्यातील १० सर्वोत्तम शिक्षकांची यादी गुणांकनासह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेला पाठविण्याच्या सूचना केलेल्या होत्या. त्याप्रमाणे कार्यवाही करून राज्यस्तरावर ३३२ नामांकने प्राप्त झाली. राज्यातील शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ठ व नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांची आयडॉल शिक्षक म्हणून ओळख निर्माण झाली आहे.

# बीबीएल सीझन-२चा नाइट रायडर्स संघ विजेता



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील तुर्भे स्टोअर येथील अन्नाभाऊ साठे मैदानावर उत्तर भारतीय संघटनेतर्फे चार दिवसीय बिग बॅश (बीबीएल सीझन-२) क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नाइट रायडर्स संघाने विजेतेपद पटकाविले. या संघाला महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश तुर्भे स्टोअर परिसरातील प्रभाग क्रमांक १४ व २०मधील झोपडपट्टी भागातील तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणे, त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे आणि त्यांना जिल्हास्तरावर संधी उपलब्ध करून देणे हा होता. खेळाडूंना आवश्यक क्रीडा साहित्य, रोख रक्कम व आकर्षक ट्रॉफी देण्याचा निर्णय संघटनेचे संस्थापक रामस्वरूप दहिया, कार्याध्यक्ष व उत्तर भारतीय नेते कमलेश वर्मा तसेच नाइट रायडर्स संघाचे प्रमुख रवी राठोड यांनी घेतला होता.

यावेळी नगरसेवक सूरज पाटील, अमित मेढकर, तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक आबासाहेब पाटील, सामाजिक कार्यकर्ते निशांत पाटील, परिवहन समिती सदस्य यशपाल ओहोळ आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे माजी नगरसेवक राजेश शिंदे, अल्पसंख्याक नेते अख्तर अली चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दीपक सिंह, संघटनेचे मार्गदर्शक विजय कन्नौजिया, गिरधारीलाल गुप्ता, चतुर्भुज टेंभरे, उपाध्यक्ष चंद्रिका प्रसाद यादव यांनी स्पर्धे दरम्यान उपस्थिती दर्शविली.





पनवेल : महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या मान्यतेने भारतीय जनता पक्ष, एम.बी. फिटनेस जिम-विचुंबे आणि बॉडी बिल्डर्स अ‍ॅण्ड फिटनेस असोसिएशन रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार चषक महाराष्ट्र श्री राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धा विचुंबे येथे पार पडली. या स्पर्धेत ९० किलो वजनी गटात रायगडच्या सुखदीप सिंग (नवीन पनवेल) याने प्रथम क्रमांक पटकावित सुवर्णपदक जिंकले.

# आयपीएलसाठी रोहितचा सराव

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या नव्या हंगामाला २८ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. यंदाच्या स्पर्धेतही अनेक संघांमध्ये नवे चेहरे खेळताना दिसतील. दरम्यान, मुंबई इंडियन्सच्या संघात मुंबईचा राजा आणि संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा दाखल झाला आहे. संघात दाखल होताच रोहितने सरावालादेखील सुरुवात केली आहे. यादरम्यान मुंबई इंडियन्स फ्रँचायझीने रोहित आणि शार्दुल ठाकूरचा व्हिडीओ शेअर केला आहे.

या व्हिडीओमध्ये लॉर्ड ठाकूर व हिटमॅन यांची जुगलबंदी पहायला मिळत आहे. रोहितला शार्दुल गोलंदाजी करत आहे. शार्दुलचा चेंडू येताच रोहितने बॅट फिरवत मोठा फटका खेळला. रोहितने चेंडू षटकारासाठी गेलेला पाहून कॅच पकडा, स्टँन्ड्समध्ये कॅच पकडा असे म्हणत त्याने अ‍ॅक्शनपण करून दाखवली. हा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.



सोशल मीडियावर व्हायरल एका व्हिडीओमध्ये रोहितने जोरदार पुल शॉट मारण्याचा प्रयत्न केला. चेंडू त्याच्या बॅटच्या वरच्या कडेला लागून हवेत उंच गेला आणि एका क्षेत्ररक्षकाने तो झेल टिपला. त्यानंतर सरावादरम्यान त्याच्या सहकाऱ्यांच्या प्रतिक्रिया पाहण्यात आल्या.

# मँचेस्टर युनायटेडचा अ‍ॅस्टन व्हिलावर रोमहर्षक विजय

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स लीगच्या शर्यतीत आपला दबदबा कायम राखताना मँचेस्टर युनायटेडने अ‍ॅस्टन व्हिलाचा पराभव केला. रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात युनायटेडने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर विजयावर शिक्कामोर्तब केले. युनायटेडतर्फे कॅसेमिरो, कुन्हा व सेस्को यांनी प्रत्येकी एक, तर अ‍ॅस्टॉन व्हिलातर्फे आर. बार्कलेने एकमेव गोल केला.

५३व्या मिनिटाला कॅसेमिराने खाते उघडले, तर ७१व्या मिनिटाला रॉस बार्कलेने व्हिलाला बरोबरी मिळवून दिली. त्यानंतर मॅथ्यूस कुन्हाने युनायटेडला पुन्हा आघाडी मिळवून दिली. ८१व्या मिनिटाला बेंजामिन सेस्कोने गोल करत युनायटेडच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. कुन्हाने दिलेल्या पासवर सेस्कोने चपळाईने चेंडू गोलपोस्टमध्ये धाडला.







